# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई
## महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (राज्य ग्रिड संहिता) विनियम, २००६


| | अनुक्रमणिका | |
|---|---|---|
| अ.क्र. | तपशील | पान क्रमांक |
| १ | संक्षिप्त शीर्षक, व्याप्ती आणि प्रारंभ | ३ |
| २ | व्याख्या | ३ |
| | **भाग-अ: सर्वसाधारण** | |
| ३ | विनियमांची व्याप्ती आणि लागू असण्याची मर्यादा | ६ |
| ४ | राज्य ग्रिड संहिता | ७ |
| ५ | ग्रिड समन्वय समिती | ८ |
| ६ | ग्रिड संहितेचे पूनर्विलोकन | ९ |
| ७ | राज्य प्रेषण केंद्राची जबाबदारी | १० |
| | **भाग-ब: नियोजन संहिता** | |
| ८ | पारेषण यंत्रणेचे नियोजन | १० |
| ९ | नियोजनाचे निकष | १२ |
| १० | नियोजनासाठी माहिती | १३ |
| | **भाग-क: जोडणीबाबतच्या अटी** | |
| ११ | जोडणीची मानके | १४ |
| १२ | सुरक्षा मानके | १५ |
| १३ | जोडणीसाठी अर्ज | १५ |
| १४ | जोडणीसाठी करार | १७ |
| १५ | ग्रिड परिमाणांतील बदल | १७ |
| १६ | जोडणीच्या ठिकाणी असलेली उपकरणे | १८ |
| १७ | संपर्क सुविधा | २० |
| १८ | यंत्रणेतील नोंद करणारी उपकरणे | २० |
| १९ | संचलन सुरक्षेची जबबदारी | २० |
| २० | जोडणीच्या जागेत प्रवेश | २२ |
| | **भाग-ड : संचलन संहिता** | |
| २१ | संचलनाच्या अटी | २३ |
| २२ | यंत्रणेच्या सुरक्षेच्या बाबी | २३ |
| २३ | मागणीचे अंदाज | २८ |
| २४ | हातांनी मागणी खंडित करणे | २८ |
| २५ | अहवाल | २९ |
| २६ | कार्यविषयक संपर्क | २९ |
| २७ | काम बंदचे नियोजन व समन्वय | ३० |
| २८ | परिस्थिती पूर्व-पदावर आणण्याची कार्यपध्दती | ३१ |
| २९ | घटनेची माहिती | ३२ |
| ३० | राज्य भार प्रेषण केंद्र आणि उप-भार प्रेषण केंद्र | ३४ |
| ३१ | राज्य भार प्रेषण केंद्र, पारेषण परवानेधारक आणि उपयोगकर्ते | ३४ |
| ३२/ ३३ | **भाग-इ : अनुसूची व प्रेषण संहिता** | ३४ |

| | | |
|---|---|---|
| | **भाग-फ :मीटर संहिता** | |
| ३४ | मीटरबाबतच्या आवश्यक बाबी | ३६ |
| | **भाग-ग :संकीर्ण** | |
| ३५ | वाद | ३७ |
| ३६ | अनुपालन | ३७ |
| ३७ | दुरुस्ती करण्याचे अधिकार | ३९ |
| ३८ | अडचणी दूर करण्याचे अधिकार | ३९ |

## महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई
## महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (राज्य ग्रिड संहिता) विनियम, २००६

**प्रस्तावना**

वीज निर्मिती आणि पुरवठ्यामध्ये निकोप स्पर्धा वाढीस लागावी तसेच राज्यांतर्गत पारेषण यंत्रणा जास्तीत जास्त कार्यक्षमतेने, खात्रीशीर आणि कमीत कमी खर्चात चालविण्याकरिता, विविध अभिकरणांनी (एजन्सीज) व राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेत, जी पश्चिम विभागीय ग्रिड यंत्रणेचा एक भाग आहे, भाग घेणा-यांनी यंत्रणेचे नियोजन, विकास, देखभाल व ती चालविण्यासाठी अनुसरावयाचे नियम, मार्गदर्शक तत्वे आणि मानके राज्य ग्रिड संहितेमध्ये देण्यात आली आहेत.

या राज्य ग्रिड संहितेमध्ये खालील भाग असतील :-

भाग-अः सर्वसाधारण- या भागात विनियमांची व्याप्ती व ते कोणाला लागू असतील व ग्रिड समन्वय समितीबाबतची माहिती आहे;

भाग-बः नियोजन संहिता- या संहितेमध्ये राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचे नियोजन व विकास करण्यासाठी वापरावयाची तत्त्वे, कार्यपध्दती व निकष विहीत करण्यात आले आहेत;

भाग-कः जोडणीच्या अटी- पारेषण परवानाधारक आणि राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेशी जोडलेल्या किंवा जोडणीसाठी इच्छूक असणा-या उपयोगकर्त्यांनी पालन करावयाची किमान तांत्रिक व रचनेबाबतची मानके, यात विहीत करण्यात आली आहेत;

भाग-डः संचलन संहिता - साधारण व असाधारण परिस्थितीत राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचे सुरक्षित संचलन आणि तिच्या वीज पुरवठ्याचा दर्जा व सुरक्षा राखता यावी म्हणून, राज्य भार प्रेषण केंद्राने राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचे व उपयोगकर्त्याने त्यांच्या सुविधांचे संचलन करण्यासंबंधीच्या अटी या संहीतेमध्ये आहेत;

भाग-इः अनुसूची व प्रेषण संहिता- या संहितेमध्ये महाराष्ट्र राज्यात अनुसूचीबाबतच्या आणि प्रेषण संहिता विकसित करण्यासंबंधीच्या तरतूदी आहेत;

भाग-फः मीटर संहिता- मीटर संहितेमध्ये उपयोगकर्त्याने किंवा पारेषण परवानाधारकाने जोडणीच्या ठिकाणी, वाणिज्यिक व संचलनाच्या प्रयोजनासाठी, मीटर्स बसविण्याकरिता व चालविण्याकरिता विकसित करावयाच्या किमान आवश्यक बाबी व मानके देण्यात आली आहेत;

भाग-गः संकीर्ण - या भागात राज्य ग्रिड संहितेचे अनुपालन आणि वाद निवारणासह इतर अनेक बाबींचा उहापोह करण्यात आला आहे.

## राज्य भार प्रेषण केंद्राची उद्दिष्टे

राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचे संचलन आणि व्यवस्थापन हे एक महत्वाचे आणि गुंतागुंतीचे काम असून त्यात नियमितपणे उद्‌भवणारे गुंतागुंतीचे व परस्परविरोधी प्रश्न सोडविण्याचे महत्वाचे कार्य राज्य भार प्रेषण केंद्र करीत असते.

राज्य भार प्रेषण केंद्राची कार्ये विद्युत अधिनियम, २००३ मध्ये विशद करण्यात आली आहेत. तथापि, या कार्यांद्वारा राज्य भार प्रेषण केंद्राची जी मूळ उद्दिष्टे साध्य करावयाची आहेत, ती स्पष्ट करणे आवश्यक आहे. राज्य भार प्रेषण केंद्राची ही उद्दिष्टे खालील प्रमाणे आहेत-

- यंत्रणेच्या सर्व ठिकाणी स्थित असलेल्या सर्व ग्राहकांना, विद्युत निर्मितीच्या उपलब्ध क्षमतेत, विजेचा अखंडीत पुरवठा होईल याची खात्री देणे;
- अनुज्ञेय मर्यादेमध्ये फ्रिक्वन्सी व व्होल्टेज राहील याची खात्री देणे;
- शक्यतो, जास्तीत जास्त किफायतशीरपणे विद्युत पुरवठा करणे; आणि
- यंत्रणेमधील बिघाडामुळे झालेल्या परिणामांचा कालावधी व व्याप्ती मर्यादित राखणे आणि ग्रिडचे नेहमीचे कामकाज शक्य तितक्या लवकरात लवकर पूर्व-पदावर आणणे.

## महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई
## महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (राज्य ग्रिड संहिता) विनियम, २००६

**<u>विद्युत अधिनियम २००३</u>**

क्रमांक मविनिआ/१५१/ राज्य ग्रिड संहिता/०३३८ - विद्युत अधिनियम, २००३ (२००३ चा ३६) च्या कलम ८६ खंड (एच) सह कलम कलम १८१ च्या खंड (झेडपी) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग खालीलप्रमाणे विनियम करीत आहे:-

### १. संक्षिप्त शीर्षक, व्याप्ती आणि प्रारंभ

१.१ या विनियमांना "महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (राज्य ग्रिड संहिता) विनियम, २००६" असे म्हणावे.

१.२ हे विनियम सबंध महाराष्ट्र राज्यास लागू राहतील.

१.३ हे विनियम दिनांक १ एप्रिल, २००६ पासून अंमलात येतील.

### २. व्याख्या

२.१ या विनियमात संदर्भानुसार वेगळा अर्थ अपेक्षित नसेल तरः

(ए) **"अधिनियम"** म्हणजे विद्युत अधिनियम २००३ (२००३ चा ३६) त्यात करण्यात आलेल्या सुधारणांसह ;

(बी) **"स्वयंचलित व्होल्टेज रेग्युलेटर "** म्हणजे वीज निर्मिती करणा-या संचाच्या (युनिट), जनरेटर टर्मिनल्सवर मोजल्या जाणा-या, व्होल्टेजवर नियंत्रण ठेवण्यासाठी सतत चालू असणारी स्वयंचलित उत्तेजक (एक्सायटेशन) नियंत्रण यंत्रणा;

(सी) **"ब्लॅक स्टार्ट कार्यपध्दती"** म्हणजे थोडा वेळ किंवा पूर्ण वेळ बंद असणा-या ग्रिडला त्याची क्षमता परत प्राप्त करुन देण्यासाठी अनुसरण्यात येणारी आवश्यक कार्यपध्दती;

(डी) **"आयोग"** म्हणजे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग;

(इ) **"जोडणी करार"** म्हणजे राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेशी द्यावयाच्या जोडणीबाबतच्या आणि/ किंवा तिच्या वापराबाबतच्या अटी ठरवून देणारा करार;

(एफ) **“जोडणी ठिकाण”** म्हणजे असे ठिकाण जेथे उपयोगकर्त्याचे किंवा पारेषण परवानाधारकाचे संयंत्र आणि/किंवा उपकरणे राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेशी जोडलेले असते;

(जी ) **“डिएफ/डिटी रिले”** म्हणजे असा रिले जो यंत्रणेच्या फ्रिक्वन्सीमध्ये बदल होण्याचा दर (वेळेच्या संदर्भात) जेव्हा विहीत मर्यादेच्या वर जातो तेव्हा कार्यरत होतो व भार नियमन सुरू करतो;

(BSÉò) **“डिस्टर्बन्स रेकॉर्डर”** म्हणजे असे उपकरण ज्यात एखाद्या घटनेच्या कालावधीत वीज यंत्रणेत अडथळे निर्माण करणा-या परिमाणांपैकी पूर्वी निवडलेल्या घटकांमध्ये होणा-या बदलाची नोंद डिजिटल आणि ॲनालॉगमध्ये केली जाते;

(आय) **“माहिती प्राप्त करुन घेण्याची यंत्रणा”** म्हणजे अशी उपकरणे ज्यात एखाद्या ठिकाणी रिले/उपकरणांची/यंत्रणेची परिमाणे ज्या वेळी कार्यरत होतात त्या वेळेनुसार होणा-या घटनाक्रमांची नोंद ठेवली जाते;

(जे) **“घटना”** म्हणजे एखादी घटना ज्यात राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेमध्ये अघोषित किंवा नियोजित नसलेले असे होणारे दोष, प्रसंग व बिघाड यांचाही समावेश असेल;

(के) **“घटना खाते-नोंदी ठेवणारे उपकरण”** म्हणजे असे उपकरण ज्यात एखाद्या ठिकाणी एखाद्या घटनेच्या कालावधीत रिले/उपकरणे ज्यावेळी कार्यरत होतात त्या वेळेनुसार होणा-या घटनाक्रमांची नोंद ठेवली जाते;

(एल ) **“दोष शोधक”** म्हणजे वाहिनीत किती अंतरावर दोष निर्माण झाला असू शकेल ते अंतर मोजण्यासाठी/दाखविण्यासाठी पारेषण वाहिनीच्या शेवटी लावण्यात येणारे उपकरण;

(एम) **“फ्लेक्सिबल आल्टरनेटींग करंट ट्रान्समिशन (एफएसीटी)”** म्हणजे अशा सुविधा ज्यांच्यामुळे ए.सी. वाहिन्यांवरील विद्युत प्रवाहाचे नियमन करणे शक्य होते ज्यामुळे, लूप प्रवाह, वाहिनींवरील भार इ.चे नियंत्रण करण्यात येते.

(BxÉ) **“उच्च दाब ” किंवा “एचटी”** म्हणजे, भारतीय विद्युत नियम, १९५६च्या नियम २ मधील उप-नियम (१)च्या खंड (एव्ही) खाली “ उच्च ” किंवा “अति उच्च” म्हणून व्याख्या करण्यात आलेले आणि अधिनियमाच्या कलम १८५ च्या उप-कलम (२) खंड (सी)ला अनुसरून विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा दाबाच्या तत्सम वर्गवारीतील, सर्व दाब;

(ओ) **“राज्यांतर्गत पारेषण यंत्रणा (आय एस टी एस)”** म्हणजे राज्याच्या क्षेत्रात पारेषण वाहिन्यांद्वारा विजेचे वहन करणारी कोणतीही यंत्रणा आणि त्यामध्ये राज्यातील पारेषण परवानाधारकांच्या सर्व पारेषण वाहिन्या, उप-केंद्रे आणि संलग्न उपकरणे यांचा समावेश होतो;

परंतु असे की, पारेषण यंत्रणा व वितरण यंत्रणा यांच्यामधील आणि वीज निर्मिती यंत्रणा व पारेषण यंत्रणा यांच्यामधील विभाजनाच्या ठिकाणाची व्याख्या ही अधिनियमाच्या कलम ७३ च्या खंड (बी) खाली प्राधिकरणाने अधिसूचित केलेल्या विनियमांमधील तरतूदींना अनुसरून असेल;

(पी) **“लघु दाब”** किंवा **“एलटी”** म्हणजे, भारतीय विद्युत नियम, १९५६च्या नियम २ मधील उप-नियम (१) च्या खंड (एव्ही) खाली “ उच्च ” किंवा “अति उच्च” म्हणून व्याख्या करण्यात आलेल्या आणि अधिनियमाच्या कलम १८५ च्या उप-कलम (२) खंड (सी)ला अनुसरून विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा दाबाच्या तत्सम वर्गवारीतील दाबांव्यतिरिक्त, इतर सर्व दाब;

(क्यु) **“कमाल सतत क्षमता”** म्हणजे विद्युत निर्मिती संचाची नेहमीची पूर्व-घोषित दराने पूर्ण भार असलेली MW मधील निर्मिती क्षमता जी विशिष्ट परिस्थितीत सातत्याने कायम राखता येऊ शकते;

(आर) **“संचलन”** म्हणजे यंत्रणेच्या संचलनाशी संबंधित निर्धारित किंवा नियोजित कार्यवाही;

(एस) **“सिंगल लाइन डायग्राम”** म्हणजे अशी आरेखने ज्यात रेषांच्या साह्याने एचव्ही/ईएचव्हीची उपकरणे एकमेकांशी आणि जोडणीच्या ठिकाणी सर्व बाहेरील सर्किटशी कशी जोडली गेली आहेत ते त्यांना क्रमांक, नांवे व लेबल लावून दाखविण्यात येते;

(टी) **“जागेची समाईक आरेखने (साइट कॉमन ड्रॉइंग)”** म्हणजे प्रत्येक जोडणीच्या ठिकाणासाठी तयार करण्यात आलेली आरेखने, ज्यांत मांडणी आरेखने, विद्युत मांडणी आरेखने, समाईक संरक्षण/नियंत्रण आरेखने आणि समाईक सेवा आरेखने समाविष्ट असतात.

(यु) **“स्पिनिंग रिझर्व्ह”** म्हणजे यंत्रणेशी ताळमेळ असणारी न वापरली जाणारी वीज निर्मितीची, ५०Hz या प्रमाण फिक्वन्सी दराने असलेली, क्षमता जिच्यामुळे, प्रेषण केंद्राकडून सूचना प्राप्त झाल्यावर अल्प कालावधीत किंवा फिक्वन्सी कमी झाल्यास ताबडतोब विजेची निर्मिती वाढविणे शक्य होते.

(व्ही) **“स्टॅटिक व्ही ए आर कॉम्पेन्सेटर”** म्हणजे रिॲक्टिव्ह पॉवर निर्मितीसाठी किंवा कमी करण्यासाठी तयार करण्यात आलेली विद्युत सुविधा.

(डब्ल्यु) **"उप-भार प्रेषण केंद्र"** म्हणजे राज्य ग्रिडवर देखरेख व नियंत्रण ठेवण्यासाठी आंबाझरी (पूर्व महाराष्ट्र) व मुंबई ( पश्चिम महाराष्ट्र) येथे स्थापन करण्यात आलेली राज्य भार प्रेषण केंद्राची कार्यालये आणि संलग्न सुविधा आणि त्यात राज्य भार प्रेषण केंद्र भविष्यात स्थापन करेल अशी कोणतीही कार्यालये आणि संलग्न सुविधांचा समावेश होईल;

(एक्स)**"अंडर फ्रिक्वन्सी रिले"** म्हणजे एक रिले जो यंत्रणेची फ्रिक्वन्सी जेव्हा विहीत मर्यादेच्या खाली जाते तेव्हा कार्यारत होतो आणि भार नियमन सुरू करतो.

(वाय) **"उपयोगकर्ता"** म्हणजे व्यक्ती तसेच राज्यातील विद्युत निर्मिती केंद्रे, वितरण परवानेधारक, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेशी थेट जोडले गेलेले वितरण परवानाधारकाचे ग्राहक आणि ज्यांनी मुक्त प्रवेश घेतला आहे अशा व्यक्ती ज्या राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेशी जोडल्या गेल्या आहेत आणि/किंवा ज्या या यंत्रणेचा वापर करतात.

परंतु असे की, या विनियमातील विनियम ३६.४ ते ३६.९ च्या प्रयोजनाकरिता उपयोगकर्त्यामध्ये, वितरण परवानेधारकाच्या वितरण यंत्रणेशी जोडल्या गेलेल्या राज्यातील सर्व वीज निर्मिती केंद्रांचाही समावेश होईल.

येथे वापरलेल्या परंतु व्याख्या न केलेल्या शब्द आणि उक्तींना अधिनियमात देण्यात आलेला अर्थ राहील.

**भाग-अः सर्वसाधारण**

## ३. विनियमांची व्याप्ती आणि लागू असण्याची मर्यादा

३.१ हे विनियम खालील संस्था/व्यक्तींना लागू असतील:

(१) राज्य भार प्रेषण केंद्र;

(२) राज्य पारेषण यंत्रणेसह राज्यातील प्रत्येक पारेषण परवानाधारक;

(३) राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेशी जोडला गेलेला आणि/किंवा तिचा वापर करत असलेला प्रत्येक उपयोगकर्ता.

परंतु असे की, कोणत्याही पारेषण परवानाधारकास किंवा उपयोगकर्त्यास, आयोग स्वतःहून किंवा पारेषण परवानाधारकाने किंवा उपयोगकर्त्याने सादर केलेल्या अर्जाच्या आधारे, आयोग त्यास राज्य ग्रिड संहिता कार्यान्वित करण्याच्या किंवा तिचे अनुपालन करण्याच्या जबाबदारीतून, निदेशात नमूद केलेल्या मर्यादेपर्यंत, मोकळे करण्यात आल्याचे निदेश देऊ शकेल.

३.२ या विनियमांच्या अधिसूचनेच्या दिनांकाच्या दिवशी राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेशी जोडणी(ण्या) असलेल्या पारेषण परवानाधारक आणि उपयोगकर्ता यांना या विनियमांखालील पुढील आवश्यक बाबींची पूर्तता करण्यासाठी जास्तीत जास्त एक वर्षाचा कालावधी देण्यात येईल-

(१) विनियम १४ प्रमाणे जोडणी करार करणे;

(२) विनियम १६.२ आणि १६.३ नुसार संरक्षक यंत्रणांची तरतूद करणे;

(३) विनियम १७ नुसार संपर्क सुविधांची तरतूद करणे;

(४) विनियम १८ नुसार यंत्रणेतील नोंद करण-या उपकरणांची तरतूद करणे;

(५) विनियम १९.३.१ प्रमाणे सिंगल लाइन डायग्राम विकसित करणे;

(६) विनियम १९.४.२ प्रमाणे जागेची समाईक आरेखने (साइट कॉमन ड्रॉइंग्स) विकसित करणे;

(७) विनियम ३४ प्रमाणे विकसित केलेल्या मीटर संहितेनुसार मीटर बसविणे व चालविणे.

३.३ या विनियमांतील विनियम २२.९, विनियम २२.१०, विनियम २२.११ आणि विनियम २२.१२ मधील गव्हर्नरच्या मुक्त कार्यवाहीबाबतच्या तरतूदी लागू असण्याची तारीख ही, अधिनियमाच्या कलम ७९ च्या खंड (एच)खाली केंद्रीय विद्युत नियामक आयोगाने विहीत केलेल्या ग्रिड संहितेमधील संबंधित तरतूदींशी सुसंगत असेल.

३.४ मुक्त प्रवेश मिळालेल्या ज्या व्यक्ती राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेशी जोडल्या गेल्या आहेत आणि/किंवा त्या यंत्रणेचा वापर करत आहेत अशा व्यक्ती, आयोगाने अधिसूचित केलेल्या पारेषण मुक्त प्रवेश विनियम आणि वितरण मुक्त प्रवेश विनियम, यांचेही पालन करतील.

## ४. राज्य ग्रिड संहिता

४.१ आयोग, राज्य ग्रिड संहितेची एक प्रत आपल्या इंटरनेट वेब-साइटवर ठेवेल आणि संहितेच्या प्रतीची मागणी करणा-या कोणत्याही व्यक्तीस, तिला लागू असणा-या राज्य ग्रिड संहितेची एक प्रत, प्रत काढण्यासाठी येणा-या वाजवी खर्चाहून अधिक नसेल इतक्या वाजवी किंमतीस, राज्य भार प्रेषण केंद्र व राज्य पारेषण कंपनी मार्फत, उपलब्ध करुन देईल.

४.२ राज्य भार प्रेषण केंद्र व राज्य पारेषण कंपनीच्या इंटरनेटवरील वेब-साइटवर ठेवण्यासाठी राज्य ग्रिड संहितेची एक अधिसूचित प्रत अनुक्रमे राज्य भार प्रेषण केंद्र व राज्य पारेषण कंपनीला आयोग उपलब्ध करुन देईल.

## ५. ग्रिड समनवय समिती

५.१ या विनियमांच्या अधिसूचनेच्या दिनांकापासून तीस (३०) दिवसांच्या आत राज्य पारेषण कंपनीकडून ग्रिड समन्वय समितीची स्थापना करण्यात येईल.

५.२ ग्रिड समन्वय समिती खालील बाबींसाठी जबाबदार राहील-

(१) या विनियमांचे तसेच या विनियमांच्या तरतूदीखाली विकसित करण्यात आलेल्या नियम व कार्यपध्दतीची अंमलबजावणी करण्यास मदत करणे;

(२) हे विनियम तसेच या विनियमांच्या तरतूदीखाली विकसित करण्यात आलेल्या नियम व कार्यपध्दतीची अंमलबजावणी करताना उद्‌भवणारे प्रश्न सोडविण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांचा अभ्यास करून शिफारशी करणे;

(३) अधिनियमाच्या व या विनियमांच्या तरतूदीनुसार राज्य ग्रिड संहितेचे पुनर्विलोकन करणे; आणि

(४) आयोग वेळोवेळी निदेशीत करेल अशा इतर बाबी.

५.३ ग्रिड समन्वय समिती खालील सदस्यांची असेल-

(अ) राज्य पारेषण कंपनीचा एक सदस्य;

(ब) राज्य भार प्रेषण केंद्राचा एक सदस्य;

(क) राज्यातील वीज निर्मिती कंपन्यांचे प्रतिनिधित्व करणारा एक सदस्य;

(ड) राज्य पारेषण कंपनी व्यतिरिक्त राज्यातील पारेषण परवानेधारकांचे प्रतिनिधित्व करणारा एक सदस्य;

(इ) राज्याच्या मालकीच्या वितरण परवानेधारकांचे प्रतिानिधित्व करणारा एक सदस्य;

(फ) राज्यातील खाजगी मालकीच्या वितरण परवानेधारकांचे प्रतिनिधित्व करणारा एक सदस्य;

(ग) राज्यातील वीज व्यापा-यांचे प्रतिनिधित्व करणारा एक सदस्य;

(ह) पश्चिम विभागीय भार प्रेषण केंद्राचे प्रतिनिधित्व करणारा एक सदस्य;

(ई) आयोग नामनिर्देशीत करेल अशा इतर व्यक्ती.

परंतु असे की, राज्य पारेषण कंपनीचा सदस्य हा समितीचा अध्यक्ष राहील;

परंतु असे की, अध्यक्ष, राज्य भार प्रेषण केंद्रातील एका व्यक्तीस ग्रिड समन्वय समितीचा आमंत्रक म्हणून, नामनिर्देशीत करेल.

परंतु आणखी असे की, राज्य भार प्रेषण केंद्राशी सल्लामसलत करून राज्य पारेषण कंपनी, ग्रिड समन्वय समितीचे कामकाज करेल.

५.४ ग्रिड समन्वय समितीच्या सदस्यांची निवड खालीलप्रमाणे करण्यात येईल–

(१) वरील कलम ५.३ मधील खंड (अ) मध्ये नमूद केलेला सदस्य हा राज्य पारेषण कंपनीच्या तांत्रिक बाबींकरिता जबाबदार असेलला राज्य पारेषण कंपनीचा संबधित संचालक असेल;

(२) वरील कलम ५.३ मधील खंड (ब) मध्ये नमूद केलेला सदस्य हा राज्य भार प्रेषण केंद्राचा प्रमूख असेल;

(३) वरील कलम ५.३ मधील खंड (क) (ड) (इ) (फ) (ग) आणि (ह) मध्ये नमूद केलेले सदस्य हे त्या त्या संस्थांकडून नामनिर्देशीत करण्यात येतील. या संस्थांची निवड, राज्यातील अशा सर्व संस्था मधून आळीपाळीने करण्यात येईल. अशा आळीपाळीने निवड करण्यात आलेल्या, प्रत्येक सदस्याची मुदत एक (१) वर्ष राहील.

परंतु असे की, प्रत्येक संस्थेने वरील समितीवर नामनिर्देशीत केलेला सदस्य हा त्या त्या संस्थेमध्ये वरिष्ठ पद धारण करणारा असेल.

## ६. ग्रिड संहितेचे पुनर्विलोकन

६.१ ग्रिड समन्वय समितीकडून ग्रिड संहितेचे पुनर्विलोकन दर बारा (१२) महिन्यांतून एकदा तरी करण्यात येईल.

६.२ ग्रिड समन्वय समितीकडून, असे पुनर्विलोकन पूर्ण झाल्यानंतर, एक अहवाल राज्य पारेषण कंपनीला पाठविण्यात येईल, ज्यात खालील बाबी असतीलः

(अ) पुनर्विलोकनाचे निष्कर्ष; आणि
(ब) राज्य ग्रिड संहितेमध्ये करावयाच्या कोणत्याही प्रस्तावित सुधारणा.

६.३ विनियम ६.२ मध्ये उल्लेख केलेला अहवाल, राज्य पारेषण कंपनी आयोगाला पाठवेल.

## ७. राज्य भार प्रेषण केंद्राची जबाबदारी

राज्य भार प्रेषण केंद्र, अधिनियमखाली आणि या विनियमांखाली त्याच्याकडे सोपविण्यात आलेली कार्ये स्वतंत्र व निःपक्षपातीप्रमाणे पार पाडेल.

परंतु असे की, अधिनियमाच्या कलम ३१ च्या उप-कलम (२) च्या पहिल्या परंतुकानुसार, जेव्हा राज्य पारेषण कंपनी राज्य भार प्रेषण केंद्र चालवित असेल तेव्हा, वरील रितीने कार्ये पार पाडणे शक्य व्हावे म्हणून राज्य भार प्रेषण केंद्राला पुरेशी स्वायत्तता देण्यात येईल.

# भाग-बः नियोजन संहिता

## ८. पारेषण यंत्रणेचे नियोजन

८.१ राज्य पारेषण कंपनी राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेसाठी लागणारा पारेषण यंत्रणा आराखडा तिच्या वेब-साईटवर प्रदर्शीत करेल आणि कोणत्याही व्यक्तीने मागणी केल्यास तिला त्याची एक प्रत उपलब्ध करुन देईल.

८.२ पारेषण यंत्रणा आराखड्याचा नियोजन कालावधी पांच (५) वर्षाचा राहील व त्याची सुरुवात तो ज्या वर्षी प्रसिध्द करण्यात येईल त्या वर्षानंतर लगेच येणा-या आर्थिक वर्षापासून होईल.

परंतु असे की, राज्य पारेषण कंपनी पारेषण यंत्रणेचा आराखडा प्रत्येक वर्षी अद्यावत करेल आणि तो विनियम ८.१ मध्ये विहीत केलेल्या पध्दतीनुसार प्रत्येक वर्षी ३०सप्टेंबर पर्यंत प्रसिध्द करेल व तो ज्या वर्षी प्रसिध्द करण्यात येईल त्या वर्षानंतर लगेच येणा-या आर्थिक वर्षापासून त्याचा पांच (५) वर्षाचा नियोजन कालावधी सुरु होईल.

८.३ पारेषण यंत्रणेच्या आराखड्याचा नमुना राज्य पारेषण कंपनीकडून उपलब्ध करुन देण्यात येईल.

८.४ पारेषण यंत्रणेच्या आराखड्यात राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचा आराखडा सविस्तरपणे देण्यात येईल व त्यात प्रस्तावित राज्यांतर्गत पारेषण योजना व सर्व उपयोगकर्त्यांच्या फायद्यासाठी यंत्रणा मजबूत करणा-या योजनांचा समावेश, असेल.

परंतु असे की, पारेषण यंत्रणेच्या आराखड्यात फक्त राज्यांतर्गत पारेषण वाहिन्यांविषयीच माहिती नसेल तर त्यात ट्रान्सफॉर्मर्स, कॅपेसिटर्स, रिॲक्टर्स, स्टॅटिक

व्ही ए आर कॉम्पेन्सेटर्स आणि फ्लेक्सिबल ऑल्टरनेटींग करंट ट्रान्समिशन यंत्रणा, यासह अतिरिक्त उपकरणांबाबतच्या माहितीचाही समावेश असेल.

परंतु आणखी असेही की, पारेषण यंत्रणेच्या आराखड्यात, निवडक राज्यांतर्गत पारेषण योजना आणि यंत्रणा मजबूत करणा-या योजनांमध्ये झालेल्या कामाच्या प्रगतीबाबतची माहितीही देण्यात येईल.

८.५ या विनियमांखाली पारेषण यंत्रणा आराखडा तयार करण्याच्या प्रयोजनासाठी राज्य पारेषण कंपनी, तिला आवश्यक वाटेल अशा माहितीसह विद्युत निर्मिती क्षमतेत भर, यंत्रणेची वाढ, मागणीबाबतचे दीर्घ-कालीन अंदाज आणि खुल्या प्रवेशासाठी आलेले सर्व अर्ज, याबाबतही माहिती मागवू शकेल.

परंतु असे की, आप-आपल्या परवाना क्षेत्राकरिता मागणीबाबतचे दीर्घ-कालीन अंदाज विकसीत करण्याची मूळ जबाबदारी ही वितरण परवानाधारकांची राहील. आयोगाने अधिसूचित केलेल्या वीज दराच्या अटी व शर्ती विनियमातील मागणीच्या अंदाजांशी संबधित असलेल्या तरतूदी, वितरण परवानाधारक विचारात घेईल.

परंतु असेही की, राज्य पारेषण कंपनी, पारेषण यंत्रणा आराखडा तयार करण्यासाठी, या विनियमाखाली देण्यात आलेल्या माहितीचा विचार करेल परंतु ही माहिती तिच्यावर बंधनकारक असणार नाही.

८.६ राज्य पारेषण कंपनी, या विनियमांखाली पारेषण यंत्रणा आराखडा तयार करण्याच्या प्रयोजनासाठी, खालील बाबींचाही विचार करेल-

(१) अधिनियमाच्या कलम ७३ खालील खंड (ए) मध्ये असलेल्या तरतूदीनुसार पारेषण यंत्रणेसाठी प्राधिकरणाने तयार केलेले आराखडे;

(२) प्राधिकरणाचा भारतातील विद्युत सर्वेक्षणाबाबतचा अहवाल;

(३) अधिनियमाच्या कलम ७३च्या खंड (डी) खाली प्राधिकरणाने विहीत केलेली ग्रिडची मानके;

(४) अधिनियमाच्या कलम ७९ च्या खंड (एच) खाली केंद्रीय विद्युत नियामक आयोगाने विहीत केलेल्या ग्रिड संहीतेतील तरतूदींप्रमाणे केंद्रीय पारेषण कंपनीने तयार केलेला पारेषण आराखडा;

(५) प्राधिकरणाने निर्गमीत केलेले पारेषण नियोजनाचे निकष आणि मार्गदर्शक तत्त्वे;

(६) प्रादेशिक विद्युत समितीच्या, असल्यास, शिफारशी/माहिती;

(७) राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेच्या विकासाशी संबंधित असलेले राष्ट्रीय विद्युत धोरणावरील अहवाल; आणि

(८) आयोगाने सूचित केलेला माहिती/ आंकडेवारीचा अन्य कोणताही स्त्रोत;

८.७ राज्य पारेषण कंपनी, अधिनियमाच्या कलम ६४ च्या उप-कलम (१) खाली आयोगाकडे मान्यतेसाठी अर्ज सादर करताना, पारेषण यंत्रणा आराखड्यात नमूद केलेल्या निवडक राज्यांतर्गत पारेषण योजना व यंत्रणा मजबूत करणा-या योजनांच्या संबंधितील तिची गुंतवणूक योजनादेखील सादर करेल.

८.८ अधिनियमाच्या कलम ६२ च्या उप-कलम (१)च्या खंड (बी) खाली राज्य पारेषण कंपनीच्या आकारांचे निश्चितीकरण करताना, या विनियमांनुसार पारेषण यंत्रणेच्या नियोजनाबाबत केलेल्या अभ्यासावरील खर्च, मान्य करण्यात येईल.

## ९. नियोजनाचे निकष

९.१ ज्या सुरक्षिततेच्या तत्त्वावर राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचे नियोजन करण्यात आले आहे त्यावर नियोजनाचे निकष आधारित असतील. ही सुरक्षिततेविषयक तत्त्वे प्राधिकरणाने दिलेल्या पारेषण नियोजनासाठीचे निकष व इतर मार्गदर्शक सूचनांनुसार असतील.

परंतु असे की, राज्य पारेषण कंपनी, पारेषण यंत्रणा आराखड्याचा विकास करण्यासाठी, योग्य यंत्रणांचा अभ्यास करेल.

९.२ एक सर्वसाधारण नियम म्हणून, स्टेडी स्टेट ऑपरेशनच्या काळात, खालील प्रकारच्या आकस्मिक बंद पडण्याच्या घटना झाल्यास त्यास तोंड देण्यास राज्यांतर्गत पारेषण यंत्रणा, भार-नियमन न करता किंवा विद्युत निर्मिती न वाढविता, समर्थ असेल-

(१) ११० kV/१३२ kV D/C वाहिनीमधील बंद किंवा,

(२) २२० kV D/C वाहिनीमधील बंद किंवा,

(३) ४०० kV S/C वाहिनीमधील बंद किंवा,

(४) सिंगल इंटरकनेक्टींग ट्रान्सफॉर्मरमधील बंद किंवा,

(५) एचव्हीडीसी बाय-पोल वाहिनीच्या एका खांब्यामधील बंद किंवा

(६) ७६५ kV S/C वाहिनीमधील बंद.

परंतु असे की, या परिस्थितीतीत वरील आकस्मिक बंदचा विचार, त्याच उप-केद्रातील नव्हे तर इतर ठिकाणच्या अन्य २२० kV D/C वाहिनी किंवा ४००kV S/C वाहिनी अशी आकस्मिकता उद्‌भवण्यापूर्वी (पूर्व-नियोजित) बंद पडली आहे असे समजून, करण्यात येईल.

९.३ यावेळी सर्व वीज निर्मिती संच त्यांच्या निर्धारित रिॲक्टिव्ह क्षमतेनुसार व ग्रिडचा व्होल्टेज त्याच्या विहीत व्होल्टेज मर्यादेत कार्यरत राहतील.

९.४ सर्वांत मोठा सिंगल इन-फीड बंद पडल्यामुळे होणारी हानि ही, स्थिरतेला धक्का न लागू देता, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणा भरुन काढण्यास समर्थ असेल.

९.५ विनियम ९.२ मध्ये व्याख्या केलेल्या कोणत्याही एका घटनेमुळे खालील बाबी घडणार नाहीत-

(१) विद्युत पुरवठ्याची हानि;

(२) विहीत मर्यादेच्या खाली किंवा वर यंत्रणेची फ्रिक्वन्सी बराच वेळ चालू राहणे;

(३) स्विकारता येणार नाही असे उच्च किंवा कमी व्होल्टेज;

(४) यंत्रणेतील अस्थिरता;

(५) राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेच्या भागांवर स्विकारता न येणारा ज्यादा भार.

९.६ सर्व उप-केंद्रांमध्ये (६६ kV/११० kV/१३२ kV आणि वरील), एचडीव्हीसी बगळता, त्या उप-केंद्राची निश्चित क्षमता राखण्यासाठी पुरेशी अतिरिक्त (रिडडन्सी) क्षमता उपलब्ध असावी याकरिता तेथे योग्य संख्येत व क्षमतेचे ट्रान्सफॉर्मर्स उभारावेत. एचडीव्हीसी उप-केंद्रात, किमान एक तरी, जादा कन्व्हर्टर/इन्व्हर्टर ट्रान्सफॉर्मर कोणत्याही वेळी वापराकरिता तयार ठेवण्यात यावा.

स्पष्टीकरण:- विनियम ९.६ च्या प्रयोजनाकरिता, निश्चित क्षमता म्हणजे, कोणताही एक ट्रान्सफॉर्मर बंद झाल्यास, उप-केंद्रात उपलब्ध असलेली किमान ट्रान्सफॉर्मर्मेशनची क्षमता.

९.७ राज्यातील विद्युत निर्मिती केंद्राच्या स्विचयार्डातील रिॲक्टिव्ह पॉवर कॉम्पेन्सेशनसह राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेच्या रिॲक्टिव्ह पॉवर कॉम्पेन्सेशनसाठीच्या नियोजनाचा अभ्यास राज्य पारेषण कंपनी करेल.

## **१० नियोजनासाठी माहिती**

१०.१ पारेषण परवानेधारक व उपयोगकर्ता यांना, पारेषण आराखडा विकसित करण्यासाठी राज्य पारेषण कंपनीला खालील प्रकारची आकडेवारी पुरवावी लागेल:-

(१) नियोजनाबाबतची प्रमाण आकडेवारी;
(२) नियोजनाबाबतची सविस्तर आकडेवारी.

१०.२ नियोजनाबाबतची प्रमाण आकडेवारी

१०.२.१ नियोजनाबाबतच्या प्रमाण आकडेवारीमध्ये, राज्य पारेषण कंपनीला, उपयोगकर्ता/ पारेषण परवानाधारक यांच्या प्रकल्प योजनांचा राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेवर होणा-या परिणामाची तपासणी करण्यासाठी सर्वसाधारणपणे पुरेशा असणा-या अपेक्षित सविस्तर आकडेवारीचा समावेश असेल.

१०.२.२ पारेषण परवानाधारक आणि उपयोगकर्ता राज्य पारेषण कंपनीने दिलेल्या प्रमाण नमुन्यामध्ये खालील माहिती वेळोवेळी राज्य पारेषण कंपनीला देतील:-

(अ) प्रकल्प नियोजनाबाबतची प्राथमिक आकडेवारी;

(ब) प्रकल्प नियोजनाबाबतची पूर्व-निश्चित केलेली आकडेवारी; आणि

(क) नियोजनाबाबतची संबध्द आकडेवारी.

परंतु असे की, पारेषण परवानाधारक आणि उपयोगकर्ता यांना पुरेसा अवधि देऊन, सदर नमुन्यांमध्ये वरील माहिती सादर करण्यासाठी, राज्य पारेषण कंपनी एक तारीख ठरवून देईल.

परंतु असे की, राज्य पारेषण कंपनी वर उल्लखलेली आकडेवारी देण्यासाठी, हे विनियम अधिसूचीत केल्यापासून एक (१) महिन्याच्या आत, प्रमाण नमुने तयार करेल व ते तिच्या इंटरनेट वेब-साइटवर उपलब्ध करुन देईल.

परंतु असेही की, अधिनियमाच्या कलम ७९ च्या खंड (एच) खाली, केंद्रीय विद्युत नियामक आयोगाने विहीत केलेल्या ग्रिड संहीतेतील तरतूदीनुसार, वर उल्लेखिलेली आकडेवारी सादर करण्यासाठी तयार केलेल्या नमुन्यांचा, राज्य पारेषण कंपनी विचार करेल.

१०.३ नियोजनाबाबतची सविस्तर आकडेवारी

१०.३.१ उपयोगकर्ता/पारेषण परवानाधारक यांच्या प्रकल्प योजनांचा राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेवर होणा-या परिणामाची तपासणी करण्यासाठी राज्य पारेषण कंपनीला सर्वसाधारणपणे अपेक्षित नसलेल्या अतिरिक्त, अधिक सविस्तर आकडेवारीचा, नियोजनाबाबतच्या सविस्तर आकडेवारीमध्ये, समावेश असेल.

१०.३.२ राज्य पारेषण कंपनीला, जशी आणि जेव्हा ती विनंती करेल त्यानुसार, उपयोगकर्ता/ पारेषण परवानाधारक नियोजनाबाबतची सविस्तर आकडेवारी देईल.

## भाग-क: जोडणीबाबतच्या अटी

## ११. जोडणीची मानके

राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेशी जोडणी, विद्युत संयंत्र व विद्युत वाहिन्या यांच्या बांधकामासाठी लागू असलेली तांत्रिक मानके, अधिनियमाच्या कलम ७३च्या खंड (बी) खाली प्राधिकरणाने अधिसूचित केलेल्या मानकांनुसार असतील.

परंतु असे की, अधिनियमाच्या कलम ७३च्या खंड (बी) खाली प्राधिकरणाकडून मानके विहीत करण्यात येत नाहीत तोपर्यंत, प्राधिकरणाच्या प्रचलित मार्गदर्शक सूचना विचारात घेण्यात येतील.

## १२. सुरक्षा मानके

विद्युत संयंत्र व विद्युत वाहिन्याच्या बांधकामाााठी, चालविण्यासाठी व देखभाल करण्यासाठी लागू असलेली सुरक्षा मानके, अधिनियमाच्या कलम ७३च्या खंड (सी) खाली प्राधिकरणाने अधिसूचित केलेल्या मानकांनुसार असतील.

परंतु असे की, अधिनियमाच्या कलम ७३च्या खंड (सी) खाली प्राधिकरणाकडून मानके विहीत करण्यात येत नाहीत तोपर्यंत, प्राधिकरणाच्या प्रचलित मार्गदर्शक सूचना विचारात घेण्यात येतील.

## १३ जोडणीसाठी अर्ज

१३.१ राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेशी जोडणीसाठी आणि/ किंवा वापर करण्यासाठी, नवीन व्यवस्था स्थापन करण्याकरिता किंवा अस्तित्वांत असलेल्या व्यवस्थेत फेरबदल करण्याकरिता, पारेषण परवानाधारक/उपयोगकर्ता राज्य पारेषण कंपनीकडे अर्ज सादर करेल.

परंतु असे की, या अधिनियमाच्या अधिसूचनेपासून दोन (२) महिन्यांच्या आत, राज्य पारेषण कंपनी, विनियम १३.१ मध्ये अर्जासाठी उल्लेखलेला प्रमाण नमुना विकसित करेल व तो तिच्या इंटरनेटवरील वेब-साईटवर उपलब्ध करुन देईल.

१३.२ विनियम १३.१ मध्ये उल्लेखलेल्या अर्जामध्ये खालील बाबींचा समावेश असेल:-

(अ) प्रस्तावित जोडणी आणि/किंवा फेरबदलाबाबतचा उद्देश नमूद करणारा अहवाल, पारेषण परवानाधारक ज्याच्या यंत्रणेशी प्रस्तावित जोडणी देण्यात येणार आहे, जे उपकरण जोडण्यात येणार आहे किंवा यापूर्वीच जोडण्यात आलेल्या उपकरणात करावयाच्या फेर-बदलाचा तपशील आणि प्रस्तावित जोडणीचे लाभधारक;

(ब) बांधकामाचे वेळापत्रक आणि काम पूर्ण करण्यासाठी ठरविलेला दिनांक;

(क) अधिनियमाला अनुसरुन करण्यात आलेल्या ग्रिडशी जोडणीसाठीच्या (कनेक्टिव्हीटी) मानकांसह विविध मानकांचे, राज्य ग्रिड संहिता, भारतीय विद्युत नियमातील तरतूदींचे पालन करण्यात येईल, याबाबत पारेषण परवानाधारक किंवा उपयोगकर्त्याने दिलेली खात्री.

१३.३ राज्य पारेषण कंपनी, ज्याच्या यंत्रणेशी जोडणी मागण्यात आली आहे त्या पारेषण परवानाधारकास, राज्य भार प्रेषण केंद्रास आणि ज्यांच्या पारेषण यंत्रणेवर अशा अर्जामुळे परिणाम होण्याची शक्यता आहे अशा राज्यातील प्रत्येक पारेषण परवानेधारकास, या अर्जाची एक प्रत पाठवेल.

१३.४ राज्य पारेषण कंपनी किंवा पारेषण परवानाधारक, ज्याच्या यंत्रणेत जोडणी मागण्यात आली आहे तो, नवीन जोडणी देण्यापूर्वी आवश्यक असेल त्यानुसार वीज यंत्रणेचा अभ्यास करेल.

१३.५ राज्य पारेषण कंपनी, विनियम १३.१ खाली अर्ज प्राप्त झाल्यानंतर आणि विनियम १३.३ मध्ये उल्लेखलेल्या संस्थांकडून प्राप्त झालेल्या सर्व सूचना आणि अभिप्रायांवर विचार केल्यानंतर, तीस (३०) दिवसांच्या आत-

(अ) राज्य पारेषण कंपनी, ती विहीत करेल अशा बदलांसह किंवा अटींसह, अर्ज स्वीकारेल;

(ब) या विनियमांतील तरतूदींना अनुसरून अर्ज नसल्यास, त्याबाबतची कारणे लेखी नोंदवून, अर्ज नाकारेल.

१३.६ विनियम १३.५ मधील उप-कलम (अ) नुसार जर अर्ज स्वीकारण्यात आला असेल तर, राज्य पारेषण कंपनी अर्जदारास अधिकृत देकार कळवेल;

परंतु असे की, राज्य पारेषण कंपनी देकाराची एक प्रत समुचित पारेषण परवानाधारकास पाठवेल.

१३.७ राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेशी ज्या व्होल्टेज-पातळीवर जोडणी देण्याचा देकार देण्यात आला असेल त्या व्होल्टेज-पातळीचे नियंत्रण, प्राधिकरणाने अधिसूचित केलेल्या मानकांनुसार आणि राज्य पारेषण कंपनीने स्वीकारलेल्या प्रचलित मार्गदर्शक तत्त्वांनुसार, करण्यात येईल.

१३.८ अर्जदार आणि समुचित पारेषण परवानाधारक, ज्याच्या यंत्रणेत जोडणी मागण्यात आली आहे, अर्जदाराने देकार स्वीकारल्यानंतर जोडणी करारास अंतिम स्वरुप देतील.

परंतु असे की, जोडणी कराराची एक प्रत राज्य पारेषण कंपनीला देण्यात येईल.

परंतु आणखी असे की, या जोडणी कराराची एक प्रत विनंती केल्यास राज्य भार प्रेषण केंद्रास राज्य पारेषण कंपनीकडून देण्यात येईल.

१३.९ संबंधित पारेषण परवानाधरक/ उपयोगकर्त्याने आवश्यक असलेल्या अटींची पूर्तता केल्यानंतर, राज्य पारेषण कंपनी संबंधित पारेषण परवानाधारक/उपयोगकर्त्याला तो राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेशी जोडला जाऊ शकेल, असे लेखी कळवेल.

## १४ जोडणीसाठी करार

१४.१ जोडणी करारांतील अटी व शर्तींमध्ये, उपयोगकर्ता किंवा पारेषण परवानाधारक यांना राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेशी जोडणी देण्यासंदर्भात, उचित अशा खालील बाबींचाही, समावेश करण्यात येईल :-

(अ) दोन्ही पक्षकार राज्य ग्रिड संहितेचे अनुपालन करतील याबाबतची अट;

(ब) जोडणी, तांत्रिक आवश्यक बाबी आणि वाणिज्यिक व्यवस्था याबाबतचा तपशील;

(क) यंत्रणा अधिक बळकट किंवा विस्तारित करण्याकरिता, संपर्क सुविधा इ. करिता, लागणा-या कोणत्याही भांडवली खर्चाचा तपशील व त्याची संबधित व्यक्ती/संस्थांमध्ये होणारी विभागणी;

(ड) जागेविषयक जबाबदा-यांची अनुसूची;

(इ) संरक्षणाबाबतची सर्वसाधारण तत्त्वे आणि मार्गदर्शक सूचना;

(फ) संरक्षण यंत्रणा;

(ग) यंत्रणेतील नोंदी करणारी उपकरणे;

(ह) संपर्क सुविधा; आणि

(ज) राज्य पारेषण कंपनीला किंवा आयोगास उचित वाटणारी कोणतीही अन्य माहिती.

१४.२ राज्य पारेषण कंपनी दोन (२) महिन्यांच्या आत एक नमुना जोडणी करार विकसित करेल व आयोगाकडे मान्यतेसाठी सादर करेल.

## १५ ग्रिड परिमाणांतील बदल

१५.१ सर्वसाधारण

१५.१.१ राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेकडून जी संयंत्र व उपकरणे सेवा घेणार असतील किंवा सेवा देणार असतील त्यांची रचना किंवा बांधकाम अशा रितीने केली जाईल की,

यंत्रणेच्या फ्रिक्वन्सी आणि व्होल्टेजच्या मूळ मूल्यात तत्क्षणीय बदल घडून आल्यास त्याचा परिणाम न होता ती संयंत्र व उपकरणे समाधानकारकरित्या चालू राहतील याची काळजी पारेषण परवानेधारक आणि उपयोगकर्ता घेतील आणि असे संयंत्र व उपकरणे राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेवर कोणताही विपरित परिणाम करणार नाहीत.

१५.२ फ्रिक्वन्सीतील बदल

१५.२.१ यंत्रणेची निर्धारित फ्रिक्वन्सी ५०.० Hz राहील आणि प्राधिकरणाच्या केलेल्या विनियमातील विहीत मर्यादेमध्ये तिच्यावर सर्वसाधारणपणे नियंत्रण ठेवण्यात येईल.

१५.३ व्होल्टेजमधील बदल

१५.३.१ प्राधिकरणाच्या विनियमांत विहीत केलेल्या व्होल्टेज मर्यादांपेक्षा व्होल्टेजमधील बदल जास्त नसतील.

## १६ जोडणीच्या ठिकाणी असलेली उपकरणे

१६.१ उप-केंद्रातील उपकरणे

१६.१.१ सर्व अति उच्च दाब (EHV) उप-केंद्रातील उपकरणे ही भारतीय मानक केंद्र/ आंतरराष्ट्रीय इलेक्ट्रो तांत्रिक आयोग/ प्रचलित प्रथा संहिता यांच्या प्रमाणे असतील.

१६.१.२आंतरराष्ट्रीय इलेक्ट्रो तांत्रिक आयोग किंवा भारतीय मानक केंद्राच्या मानकांच्या दर्जाची खात्री देण्यासाठी, सर्व उपकरणांची रचना, उत्पादनाची चांचणी आवश्यक असणा-या मानकांनुसार घेऊन ती त्यानुसार प्रमाणित करण्यात येतील.

१६.१.३ विशिष्ट जोडणी करारात राज्य पारेषण कंपनीने दिलेल्या सल्ल्यानुसार, निदान शॉर्ट सर्किट करंटमध्ये तरी, व्यत्यय निर्माण करु शकणा-या सर्किट ब्रेकरद्वारा, उपयोगकर्ता आणि राज्यांतर्गत पारेषण यंत्रणा यांच्यातील प्रत्येक जोडणी, जोडणीच्या ठिकाणी, नियंत्रित करण्यात येईल.

१६.२ दोष निवारण कालावधी

१६.२.१ राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेशी थेट जोडलेल्या उपयोगकर्त्याच्या उपकरणावरील तीन-फेज दोष (बस-बार्सच्या जवळचा) आणि उपयोगकर्त्याच्या उपकरणाशी जोडलेल्या राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेवरील तीन-फेज दोष (बस-बार्सच्या जवळचा) असल्यास, तसेच जेव्हा सर्व उपकरणे व्यवस्थितपणे काम करीत असतील तेव्हा, प्राथमिक संरक्षण योजनांकरिता त्यासाठीचा दोष निवारण कालावधी, हा खालीलपेक्षा जास्त नसेल:-

(अ) १०० मिली सेकंद्स ८०० kV क्लास आणि ४०० kV करिता

(ब) १६० मिली सेकंद्स २२० kV आणि १३२ kV/११० kV करिता

१६.२.२ वरील दोष निवारण कालावधीत दोष निवारण करणे शक्य व्हावे यासाठी पुरविण्यात आलेल्या प्राथमिक संरक्षण यंत्रणेत बिघाड झाल्यास आवश्यक असलेल्या अलगतेसाठी/ संरक्षणासाठी, सहाय्यक संरक्षण यंत्रणा पुरविण्यात येईल. जर विद्युत निर्मिती संच थेट राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेशी जोडण्यात आलेला असेल तर तो, सहाय्यक संरक्षण यंत्रणेकडून राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेवरील दोष निवारण होईपर्यंत, तग धरुन राहण्याइतक्या क्षमतेचा, राहील.

१६.३ संरक्षण यंत्रणा

१६.३.१ सर्व पारेषण परवानाधारक आणि उपयोगकर्ता, अशा संरक्षण यंत्रणा उपलब्ध करतील की ज्यामुळे, विहीत करण्यात आलेल्या दोष निवारण कालावधीत, खात्रीपूर्वक, निवडीने व शीघ्रगतीने, सदोष उपकरणांना अलग करता येईल आणि इतर उपकरणांचे, अंतर्गत व बाह्य अशा सर्व प्रकारच्या दोषांपासून, रक्षण करणे शक्य होईल.

परंतु असे की, सर्व उपयोगकर्ता आणि पारेषण परवानेधारक जोडणी करारात विहीत करण्यात आल्याप्रमाणे संरक्षण यंत्रणा उपलब्ध करतील.

१६.३.२ प्रादेशिक विद्युत मंडळ/प्रादेशिक विद्युत समितीतर्फे प्रादेशिक पातळीवर रिले सेटींगचा समन्वय साधण्यात येईल.

१६.४ रिॲक्टिव्ह पावर कॉम्पेन्सेशन

१६.४.१ भार बिंदूच्या (लोड पॉइंटच्या) जवळ असणा-या कमी व्होल्टेज यंत्रणेतील उपयोगकर्त्यांकडून, शक्य असेल तितके, रिॲक्टिव्ह पॉवर कॉम्पेन्सेशन आणि/ किंवा इतर सुविधा उपलब्ध करुन देण्यात येतील की ज्यामुळे, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेला किंवा यंत्रणेकडून रिॲक्टिव्ह पॉवरवरचे अदान-प्रदान करण्याची आणि राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचे व्होल्टेज विहीत मर्यादेमध्ये राखता येण्याची गरज टाळता येईल.

१६.४.२ जोडणी करारात नमूद करण्यात आलेल्या मर्यादेमध्ये तात्पुरत्या जादा व्होल्टेजचे नियंत्रण करणे शक्य व्हावे म्हणून लाइन रिॲक्टर्स उपलब्ध करुन देण्यात येतील.

१६.४.३ उपयोगकर्त्याने पुरवावयाचे अतिरिक्त रिॲक्टिव्ह कॉम्पेन्सेशन, राज्य पारेषण कंपनीकडून, कार्यान्वित करण्याच्या जोडणी करारात सूचित करण्यात येईल.

१६.४.४ निर्धारित व्होल्टेजच्या ९५% खाली व्होल्टेज असेल तेव्हा त्या अदला-बदलाच्या (इंटरचेंजच्या) ठिकाणी रिॲक्टिव्ह पॉवर कमीत कमी घेण्याच्या दृष्टीने उपयोगकर्ता प्रयत्न करेल आणि जेव्हा निर्धारित व्होल्टेजच्या १०५% वर व्होल्टेज असेल तेव्हा रिॲक्टिव्ह पॉवर आत घालणार नाही. उपयोगकर्त्याने राज्य भार पारेषण केंद्रास केलेल्या विनंतीस अनुसरुन, रिॲक्टिव्ह पॉवरमधील इंटरचेंज नियंत्रित करण्यासाठी

वीज घेण्याच्या ठिकाणी ट्रान्सफॉर्मर आंतर-जोडणी टॅप्स, दोन इंटरचेंजमध्ये वाजवी अंतर ठेवून, बदलता येतील.

१६.४.५ राज्य भार प्रेषण केंद्राच्या सूचनांप्रमाणे, सबंध ग्रिड मध्ये सर्व ४०० kV बस आणि लाइन रिॲक्टर्स चालू किंवा बंद करण्यात येतील. फक्त राज्य भार प्रेषण केंद्राच्या सूचनांप्रमाणे, सर्व ४००/२२० kV ट्रान्सफॉर्मर्स आंतर-जोडणी टॅप्स बदलण्यात येतील.

## १७. संपर्क सुविधा

१७.१ राज्य ग्रिडशी आवश्यक संपर्क व माहितीचे देवाण-घेवाण आणि राज्य भार प्रेषण केंद्राचे ग्रिडवर पर्यवेक्षण/ नियंत्रण, साधारण आणि असाधारण परिस्थितीत, सुकर व्हावे म्हणून अखंडीत व कार्यक्षम अशी संभाषण व माहिती संपर्क यंत्रणा पुरविण्यात येईल.

१७.२ सर्व उपयोगकर्ते आणि पारेषण परवानेधारक आपआपल्या यंत्रणेत, जोडणी करारात विहीत करण्यात आल्याप्रमाणे आवश्यक सुविधा पुरवतील.

परंतु असे की, राज्य भार प्रेषण केंद्राचे मार्गदर्शन, इंटरफेसच्या गरजा, आणि लागू असणारे अन्य मार्गदर्शन व तपशील विचारात घेऊन, संपर्कासाठी व माहितीचे अदान-प्रदान करण्यसाठी साधने/उपकरणे पुरविण्यात येतील.

## १८ यंत्रणेतील नोंद करणारी उपकरणे

१८.१ माहिती प्राप्त करुन घेण्याची यंत्रणा/डिस्टर्बन्स रेकॉर्डर/ घटना खाते-नोंदी ठेवणारे उपकरण/दोष शोधक (वेळेशी ताळमेळ घालणा-या उपकरणासह), अशी नोंदी करणारी उपकरणे राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेत, यंत्रणेच्या गतिमान कामगिरीच्या नोंदी ठेवण्यासाठी, पुरविण्यात येतील.

१८.२ सर्व उपयोगकर्ते आणि पारेषण परवानेधारक, जोडणी करारात विहीत करण्यात आल्याप्रमाणे, पूर्वी मान्य केलेल्या वेळापत्रकानुसार, सर्व आवश्यक नोंदी करणारी उपकरणे उपलब्ध करुन देतील.

## १९ संचलन सुरक्षेची जबाबदारी

१९.१ पारेषण परवानेधारक आणि उपयोगकर्ते, प्रत्येक जोडणीच्या ठिकाणाच्या सुरक्षिततेकरिता जागेविषयक जबाबदा-यांच्या अनुसूचीमध्ये दर्शविल्याप्रमाणे जबाबदार राहतील.

१९.२ जागेविषयक जबाबदा-यांची अनुसूची

१९.२.१ प्रकल्प किंवा जोडणी कार्यान्वित करण्यापूर्वी, संबंधित पारेषण परवानाधारक आणि उपयोगकर्ता, प्रत्येकाची जागेची मालकी तसेच सुरक्षाविषयक जबाबदा-या स्पष्ट करण-या जागेविषयक जबाबदा-यांची अनुसूची, तयार करतील.

१९.२.२ जागेविषयक जबाबदा-यांची अनुसूची ही संबंधित जोडणी करारास अनुसरून संबधित पारेषण परवानाधारकाकडून विकसित करण्यात येईल आणि जोडणीच्या ठिकाणी स्थापित करण्यात आलेल्या प्रत्येक संयंत्र व उपकरणाकरिता खालील बाबींची माहिती त्यात देण्यात येईल:-

(१) संयंत्र/उपकरणांची मालकी;

(२) संयंत्र/उपकरणांवरील नियंत्रणाची जबाबदारी;

(३) संयंत्र/उपकरणे संचलनाची जबाबदारी;

(४) संयंत्र/उपकरणांच्या देखभालीची जबाबदारी; आणि

(५) जोडणीच्या ठिकाणी असलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या सुरक्षेसंबंधीच्या सर्व बाबींची जबाबदारी.

१९.२.३ जागेविषयक जबाबदा-यांची अनुसूची तयार करताना अनुसरावयाचे नमुने, तत्त्वे व मूलभूत कार्यपध्दती राज्य पारेषण कंपनीकडून, या विनियमांच्या अधिसूचनेपासून तीन (३) महिन्यांच्या आत, आखून देण्यात येतील आणि प्रत्येक उपयोगकर्ता आणि पारेषण परवानाधारकाला, त्यांची पूर्तता करण्यासाठी, देण्यात येतील.

परंतु असे की, वर उल्लेखलेल्या नमुने, तत्त्वे व मूलभूत कार्यपध्दतीसंबधीची माहिती राज्य पारेषण कंपनी आपल्या इंटरनेट वेब-साइटवर ठेवेल.

१९.३ सिंगल लाइन डायग्राम

१९.३.१ जोडल्या गेलेल्या उपयोगकर्ता किंवा पारेषण परवानाधारकाकडून राज्य पारेषण कंपनीला प्रत्येक जोडणीच्या ठिकाणाकरिता सिंगल लाइन डायग्राम देण्यात येईल.

परंतु असे की, राज्य भार प्रेषण केंद्राने विनंती केल्यास राज्य पारेषण कंपनी वरील माहिती त्याला पाठवेल.

१९.३.२ सिंगल लाइन डायग्राममध्ये उच्च दाबाशी संलग्न असलेली सर्व उपकरणे तसेच सर्व बाह्य सर्किटशी असलेल्या जोडण्या यांचा समावेश असेल व त्यावर क्रमांक, नावे व लेबल लावण्यात येतील.

१९.३.३ एखादे उपकरण बदलण्याचे प्रस्तावित केले असल्यास, संबंधित उपयोगकर्ता किंवा पारेषण परवानाधारक आवश्यक बदल राज्य पारेषण कंपनीला व सर्व संबंधितांना कळवेल. संबंधित उपयोगकर्ता किंवा पारेषण परवानाधारक सिंगल लाइन डायग्राम योग्य रितीने अद्यावत करेल आणि त्याची एक प्रत राज्य पारेषण कंपनीला उपलब्ध करुन देईल.

१९.४ जागेची समाईक आरेखने (साइट कॉमन ड्रॉइंग्स)

१९.४.१ जागेची समाईक आरेखने ही प्रत्येक जोडणीच्या ठिकाणाकरिता तयार करण्यात येतील व त्यात खालील बाबींचा समावेश असेलः-

(१) जागेची मांडणी;

(२) विद्युत मांडणी;

(३) संरक्षण/ नियंत्रणाचा तपशील; आणि

(४) समाईक सेवेची ड्रॉइंग्स.

१९.४.२ पारेषण परवानाधारक आणि उपयोगकर्ता प्रत्येक जोडणीच्या ठिकाणी असलेल्या त्यांच्या यंत्रणा/सुविधांचे सविस्तर आरेखने तयार करतील व त्याच्या प्रती अनुक्रमे संबंधित उपयोगकर्ता व पारेषण परवानाधारकांना उपलब्ध करुन देतील.

१९.४.३ जोडणीच्या ठिकाणी असलेल्या त्यांच्या यंत्रणा/सुविधांच्या संदर्भात जागेच्या समाईक आरेखनांमध्ये पारेषण परवानाधारक आणि उपयोगकर्ता यांना कोणताही बदल करणे आवश्यक वाटल्यास, अशा बदलांचा तपशील दुस-या व्यक्ती/संस्थेला शक्य तितक्या लवकर देण्यात येईल.

## २०. जोडणीच्या जागेत प्रवेश

२०.१ पारेषण परवानाधारक किंवा उपयोगकर्ता, ज्यांच्या मालकीची जोडणीची जागा आहे, ते ज्याचे उपकरण बसवावयाचे प्रस्तावित करण्यात आले आहे/ बसवले आहे अशा दुस-या पारेषण परवानाधारक किंवा उपयोगकर्त्याला, उपकरण बसविण्यासाठी, चालविण्यासाठी, देखभाल इ.करिता, त्याच्या जागेत योग्य प्रवेश देतील व इतर आवश्यक सुविधा पुरवतील.

२०.२ पारेषण परवानाधारक किंवा उपयोगकर्ता, जोडणीच्या जागेतील त्यांचे हक्क सुरक्षित ठेवत असतानाच, संबधित पारेषण परवानाधारक किंवा उपयोगकर्त्यास अनिवार्य असलेला प्रवेश उपलब्ध करुन देता यावा म्हणून, पारेषण परवानाधारक किंवा उपयोगकर्त्यांमध्ये लेखी कार्यपध्दती व करार विकसित करण्यात येतील.

**भाग-ड संचलन संहिता**

## २१ संचलनाच्या अटी

२१.१ राज्य भार प्रेषण केंद्र, राज्यांतर्गत पारेषण व्यवस्थेच्या एकूण संचलनावर देखरेख ठेवेल.

२१.२ राज्य ग्रिडच्या व्यवस्थापनासाठी राज्य भार प्रेषण केंद्र अंतर्गत संचलन कार्यपध्दती विकसित करुन तिची कागदपत्रे तयार करेल. या अंतर्गत संचलनाच्या कार्यपध्दतीमध्ये खालील बाबींचा समावेश असेल:-

(१) ब्लॅक स्टार्ट कार्यपध्दती;

(२) भार नियमनाच्या कार्यपध्दती;

(३) आयलँडिंग कार्यपध्दती; आणि

(४) राज्य भार प्रेषण केंद्राला उचित वाटतील अशा अन्य कोणत्याही कार्यपध्दती;

परंतु असे की, अशा कार्यपध्दती प्रादेशिक विद्युत समिती आणि प्रादेशिक भार प्रेषण केंद्राशी सल्लामसलत करुन विकसित करण्यात येतील.

परंतु आणखी असेही की, अशा कार्यपध्दती आयोगास, तीन (३) महिन्यांच्या आत, मंजूरीसाठी सादर करण्यात येतील.

२१.३ उप-भार प्रेषण केंद्र, विद्युत संयंत्र, १३२ kV आणि वरील उप-केंद्रांसह राज्य भार प्रेषण केंद्राच्या नियंत्रण कक्षात, तसेच पारेषण परवानाधारक आणि उपयोगकर्ता यांच्या अन्य कोणत्याही नियंत्रण कक्षात, चोवीस तास अर्हताप्राप्त आणि पुरेसे प्रशिक्षण घेतलेले कर्मचारी सुव्यवस्था राखतील.

## २२. यंत्रणेच्या सुरक्षेच्या बाबी

२२.१ सर्व उपयोगकर्ते आणि पारेषण परवानेधारक आपआपल्या विद्युत यंत्रणा आणि विद्युत केंद्रे सर्व काळ वेळ आणि गती सारखी ठेवून (सिंक्रोनाइझ करुन) चालू ठेवण्यासाठी प्रयत्नशील राहतील की ज्यायोगे राज्यातील सबंध यंत्रणा ही एक तालबध्द यंत्रणा (सिंक्रोनाइझ्ड) म्हणून कार्यरत राहील .

२२.२ खालील बाबी वगळता, राज्य ग्रिडचा कोणताही भाग राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेपासून मुद्दाम अलग करण्यात येणार नाही:-

(१) आणीबाणीच्या परिस्थितीत, आणि जेव्हा अशा अलगतेमुळे सबंध ग्रिडचे कामकाज ठप्प होणे टाळता येणार असेल अशा परिस्थितीत आणि/किंवा जेव्हा वीज पुरवठा लवकर पूर्व-वत करणे शक्य होणार असेल तेव्हा;

(२) जेव्हा किंमती उपकरणास गंभीर धोका होण्याची वेळ जवळ येऊन ठेपली असेल व अशा अलगतेमुळे तो टाळता येणे शक्य होणार असेल तेव्हा;

(३) जेव्हा अशी अलगता राज्य भार प्रेषण केंद्राकडून विनिर्दिष्टपणे सूचित करण्यात आली असेल तेव्हा.

२२.३ जेव्हा परिस्थिती अनुकूल होईल तेव्हा लगेच राज्य ग्रिडची तालबध्दता पूर्णपणे पूर्ववत, करण्यात येईल. स्वतंत्रपणे आखण्यात आलेल्या संचलन कार्यपध्दतीनुसार तालबध्दता पूर्व-पदावर आणण्यात येत असल्याबद्दल राज्य भार प्रेषण केंद्र लक्ष ठेवून असेल.

२२.४ राज्य भार प्रेषण केंद्राने विनिर्दिष्टरित्या सूचित केले असल्याशिवाय किंवा राज्य भार प्रेषण केंद्राची विनिर्दिष्ट आणि पूर्व-परवानगी घेतली असल्याशिवाय, राज्य ग्रिडचा कोणताही महत्वाचा भाग उघडता येणार नाही किंवा यंत्रणेपासून अलग करता येणार नाही. ग्रिड मधील असे महत्वाचे भाग, ज्यांना वरील अट लागू असेल, त्यांची यादी राज्य भार प्रेषण केंद्र, पारेषण परवानाधारक आणि उपयोगकर्ता यांच्याशी सल्लामसलत करुन, तयार करेल व ती राज्य भार प्रेषण केंद्रात उपलब्ध असेल.

२२.५ जर आणीबाणीच्या परिस्थितीत ग्रिड मधील महत्वाचा भाग उघडावा/यंत्रणेतून अलग करावा लागला तर, अशी घटना घडल्यानंतर, जेवढे शक्य होईल तितक्या लवकर, राज्य भार प्रेषण केंद्रास कळविण्यात येईल.

२२.६ वरील विनियम २२.४ मध्ये उल्लेखल्यानुसार, राज्य ग्रिडचा कोणताही भाग आपोआप बंद पडल्यास किंवा बंद केल्यास, संबंधित पारेषण परवानाधारक किंवा उपयोगकर्ता राज्य भार प्रेषण केंद्रास, लवकरात लवकर, तसे नेमके कळवेल. त्याचे तोर्यंत निश्चित केलेले कारण, आणि स्थिती पूर्व-वत करण्यासाठी लागणारा अंदाजे कालावधी देखील कळविण्यात येईल. बंद पडलेला भाग शक्य तितक्या लवकर पूर्ववत करण्यासाठी सर्व वाजवी प्रयत्न करण्यात येतील.

२२.७ उत्पादकाने विहीत केलेल्या रचनेच्या मर्यादेच्या अधीन राहून, यंत्रणेच्या निर्धारित फिक्वन्सी व व्होल्टेजने, आपला नेहमीचा निर्धारित ॲक्टिव्ह/ रिॲक्टिव्ह वीज पुरवठा, सतत करण्यास विद्युत निर्मिती संच समर्थ असेल.

२२.८ जोडणी करारात नमूद केल्याप्रमाणे विद्युत निर्मिती संचाला स्वयंचलित व्होल्टेज रेग्युलेटर, संरक्षक व सुरक्षा उपकरणे, पुरविण्यात येतील.

२२.९ प्रत्येक विद्युत निर्मिती केंद्राला, ज्याचे एकूण ड्रूप वैशिष्टय हे ३% ते ६% या मर्यादांमध्ये असेल असा एक टर्बाइन स्पीड गव्हर्नर लावण्यात येईल व असा टर्बाइन स्पीड गव्हर्नर हा नेहमीच सर्व्हिसमध्ये असेल.

परंतु असे की, जर पन्नास (५०) MW वरील क्षमतेचे कोणतेही विद्युत निर्मिती संच त्याच्या नेहमीच्या संचलनात गव्हर्नर नसताना चालवावे लागणार असेल तर अशा संचलनाचे कारण व कालावधी ताबडतोब राज्य भार प्रेषण केंद्रास कळविण्यात येईल.

२२.१० लोड लिमिटर्सबरोबर/ मध्ये असलेल्या सुविधा, ऑटोमॅटिक टर्बाइन रन-अप सिस्टिम, टर्बाइन पर्यवेक्षकीय नियंत्रण, समन्वित नियंत्रण यंत्रणा इ.चा वापर गव्हर्नरचे नित्याचे काम कोणत्याही प्रकारे निष्प्रभ करण्यासाठी करण्यात येणार नाही. मुद्दाम केलेले कोणतेही डेड बॅन्ड्स आणि/ किंवा विलंबास मान्यता देण्यात येणार नाही.

२२.११ जेव्हा फ्रिक्वन्सी खाली जाईल तेव्हा कोणताही विद्युत निर्मिती संच, कमाल सतत क्षमता १०५%च्या मर्यादेच्या अधीन राहून, त्याचे विजेचे उत्पादन ५% ने तत्क्षणी वाढवू शकण्यास समर्थ असेल. जर वाढीव वीज उत्पादनाची पातळी राखणे शक्य नसेल तर, पूर्वीच्या वीज निर्मीतीच्या पातळीवर वीज उत्पादन आणण्याचा वेग प्रति मिनिट १% हून अधिक जलद नसेल;

परंतु असे की, जर पन्नास (५०) MW वरील क्षमतेचे कोणतेही विद्युत निर्मिती संच वरील आवश्यक बाबींची पूर्तता करीत नसेल तर, राज्य भार प्रेषण केंद्राची परवानगी प्राप्त झाल्यानंतरच, तो (राज्य ग्रिडशी तालबध्दतेने- (सिंक्रोनाइझ्ड) ) चालू राहू देण्यात येईल.

परंतु असे की, स्पिनिंग रिझर्व्हमध्ये उद्भवलेली तत्सम तूट, उपयोगकर्ता त्याच्या इतर विद्युत निर्मिती संचांवर जादा स्पिनिंग रिझर्व्ह ठेवून भरून काढेल.

२२.१२ गव्हर्नरची सेटिंग बदलण्याकरिता शिफारस करण्यात आलेला नियंत्रण दर, म्हणजे विद्युत निर्मिती केंद्रांचा प्रकार व आकार कोणताही असला तरी, सर्व विद्युत निर्मिती संचांकरिता (वीज निर्मितीच्या पातळीवर) वीज निर्मिती वाढविण्याचा किंवा कमी करण्यासाठीचे पुरवणी नियंत्रण, प्रति मिनिट एक (१.०)% किंवा उत्पादकाच्या मर्यादेप्रमाणे असेल. तथापि, जर फ्रिक्वन्सी ४९.५ Hz च्या खाली गेली तर अंशतः भारित असलेले सर्व विद्युत निर्मिती संच, त्यांच्या क्षमतेनुसार, अधिक गतीने जादा भार घेतील.

२२.१३ किंमती उपकरणाला होऊ घातलेले नुकसान टाळण्याशिवाय किंवा आणीबाणीच्या परिस्थितीच्या व्यतिरिक्त, राज्य भार प्रेषण केंद्रास पूर्वी कळविल्याशिवाय आणि त्याची संमती घेतल्याशिवाय, कोणताही उपयोगकर्ता त्याच्या विद्युत निर्मिती संचातील वीज उत्पादन, राज्य भार प्रेषण केंद्राने घालून दिलेल्या मर्यादेपेक्षा अधिक एकाएकी कमी करणार नाही, विशेषतः जेव्हा फ्रिक्वन्सी कमी होत असेल किंवा ती ४९.० Hz च्या खाली असेल. तसेच, राज्य भार प्रेषण केंद्रास पूर्वी कळविल्याशिवाय आणि त्याची

संमती घेतल्याशिवाय कोणताही उपयोगकर्ता त्याच्या भारात राज्य भार प्रेषण केंद्राने घालून दिलेल्या मर्यादेपेक्षा अधिक वाढ एकाएकी होऊ देणार नाही.

२२.१४ सर्व विद्युत निर्मिती संचांचे स्वयंचलित व्होल्टेज रेग्युलेटर्स, उचित सेटिंगसह, सर्वसाधारणपणे कार्यरत असतील.

परंतु असे की, जर स्वयंचलित व्होल्टेज रेग्युलेटर्स सर्व्हिसमध्ये नसताना, पन्नास (५०) MW वरील क्षमतेचे विद्युत निर्मिती संच चालवावे लागणार असेल तर त्याचे कारण व कालावधी ताबडतोब राज्य भार प्रेषण केंद्रास कळविण्यात येईल व संच चालविण्याची परवानगी घेण्यात येईल.

२२.१५ जेथे, विद्युत निर्मिती संचाच्या स्वयंचलित व्होल्टेज रेग्युलेटर्समध्ये विद्युत यंत्रणा स्टॅबिलायझर्स, जर तरतूद केली असेल तर , त्या त्या विद्युत निर्मिती संचाचे मालक ते, राज्य पारेषण कंपनीने या प्रयोजनाकरिता वेळोवेळी तयार केलेल्या योजनेनुसार, योग्य रित्या जुळवून घेतील. राज्य पारेषण कंपनीला विद्युत यंत्रणा स्टॅबिलायझरची तपासणी करण्यास व तसेच, जेव्हा आवश्यकता वाटेल तेव्हा, आणखी जुळवून धेण्याची परवानगी असेल.

२२.१६ प्रादेशिक विद्युत मंडळ/प्रादेशिक विद्युत समितीच्या संरक्षण समितीने स्वतंत्रपणे अंतिम स्वरुप द्यावयाच्या योजनेनुसार, सबंध राज्यांतील ग्रिडमध्ये संरक्षण व रिले सेटिंगच्या तरतूदीमध्ये नियतकालिक समन्वय साधण्यात येईल.

२२.१७ प्रादेशिक भार प्रेषण केंद्र, उपयोगकर्ते आणि पारेषण परवानेधारक यांच्याशी समन्वय साधून राज्य भार प्रेषण केंद्र, फ्रिक्वन्सी नेहमी ४९.० - ५०.५ Hz या टप्प्यामध्ये ठेवण्यासाठी शक्य असतील ते सर्व प्रयत्न करेल, ज्या फ्रिक्वन्सी टप्प्यामध्ये आय.ई.सी. स्पेसिफिकेशन्सला अनुकूल असणारे वाफेवरील टर्बाइन्स सुरक्षितपणे सतत चालू राहू शकतात.

२२.१८ प्रादेशिक विद्युत मंडळ/प्रादेशिक विद्युत समितीने स्वतंत्रपणे अंतिम स्वरुप दिलेल्या योजनेनुसार उपयोगकर्ते आणि पारेषण परवानेधारक, जेथे शक्य असेल तेथे, आप-आपल्या यंत्रणांमध्ये स्वयंचलित अंडर-फ्रिक्वन्सी आणि डीएफ/डीटी रिलेवर आधारित भार नियमन/ आयलँडिंग योजना पुरवतील, ज्यामुळे फ्रिक्वन्सीतील घसरण व परिणामी राज्य ग्रिडचे कोलमडणे/विघटन होणे थांबविता येईल व आणीबाणीच्या परिस्थितीत निर्मिती संचांचे एकामागून एक बंद पडणे टाळण्याकरिता त्याचा परिणामकारकरित्या वापर होत असल्याची खात्री करतील.

२२.१९ उपयोगकर्ते आणि पारेषण यंत्रणा परवानेधारक, विनियम २२.१८ मध्ये उल्लेखलेल्या अंडर-फ्रिक्वन्सी आणि डीएफ/डीटी रिलेवर आधारित भार नियमन/आयलँडिंग योजना नेहमी कार्यरत राहतील, याची खात्री करतील.

परंतु असे की, टोकाच्या आकस्मिक प्रसंगी, राज्य भार प्रेषण केंद्राच्या पूर्व मान्यतेने, रिलेज हे यंत्रणेपासून तात्पुरते बाहेर ठेवता येऊ शकतील.

२२.२० अंडर-फ्रिक्वन्सी रिलेजची राज्य पारेषण कंपनी नियतकालिक तपासणी करेल व अहवाल राज्य भार प्रेषण केंद्राला पाठवेल. राज्य भार प्रेषण केंद्र अंडर-फ्रिक्वन्सी रिले आणि/किंवा डीएफ/डीटी रिले संचलनाचा अभिलेख ठेवेल.

२२.२१ व्होल्टेज एकाएकी खाली येणे किंवा निर्मिती संच एकामागून एक बंद होणे या सारख्या परिस्थितीपासून संरक्षण करण्यासाठी, प्रादेशिक विद्युत मंडळ/प्रादेशिक विद्युत समितीने अंतिम स्वरुप दिल्याप्रमाणे, विद्युत यंत्रणेमध्ये (इंटर-ट्रिपिंग व रन-बॅकसह) यंत्रणा संरक्षक योजना निवडणे, बसविणे व सुरु करण्याच्या कामास उपयोगकर्ते आणि पारेषण परवानेधारक, मदत करतील.

परंतु असे की, राज्य भार प्रेषण केंद्र, उपयोगकर्ते आणि पारेषण परवानेधारक यांच्याशी सल्लामसलत केल्यानंतर, राज्य पारेषण कंपनी अशा योजना तयार करेल.

२२.२२ उपयोगकर्ता आणि पारेषण परवानाधारक हे अंतर्गत व राज्य भार प्रेषण केंद्राशी, इतर उपयोगकर्ते आणि इतर पारेषण परवानेधारक यांच्याशी संपर्कासाठी एक पुरेशी व खात्रीशीर संपर्क सुविधा उपलब्ध करुन देतील ज्यामुळे ग्रिडची विश्वासार्हता व सुरक्षा राखण्यासाठी आवश्यक असणा-या आकडेवारी/माहितीचे अदान-प्रदान करणे शक्य होईल. जेथे शक्य असेल तेथे, महत्वाच्या मार्गांवर, उदा. राज्य भार प्रेषण केंद्र ते उपयोगकर्ते, संपर्क चालू रहावा म्हणून जरुरीपेक्षा जास्त असलेली (रिडंडन्सी) व्यवस्था आणि पर्यायी व्यवस्था कार्यरत ठेवण्यात येतील.

२२.२३ ग्रिडला होणा-या कोणत्याही अडथळ्याचे/ घटनेचे विश्लेषण करण्याच्या प्रयोजनार्थ उपयोगकर्ते आणि पारेषण परवानेधारक, मागितलेली माहिती/आकडेवारी तसेच, डिस्टर्बन्स रेकॉर्डर/ सिक्वेन्शिअल इव्हेंट रेकॉर्डर, राज्य भार प्रेषण केंद्राला पाठवतील. राज्य किंवा प्रादेशिक ग्रिडची विश्वासार्हता आणि सुरक्षा राखण्यासाठी व घटनेच्या विश्लेषणासाठी कोणताही उपयोगकर्ता किंवा पारेषण परवानाधारक राज्य भार प्रेषण केंद्राला हवी असणारी कोणतीही माहिती/आकडेवारी देण्यास अडथळा निर्माण करणार नाही.

२२.२४ राज्य भार प्रेषण केंद्र, उपयोगकर्ते आणि पारेषण परवानेधारक ग्रिडचे व्होल्टेज नेहमी खालील दरम्यान राहील यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करतील:-

| दाब-(kV rms) | | |
|---|---|---|
| नेहमीचा | कमाल | किमान |
| ४०० | ४२० | ३६० |
| २२० | २४५ | २०० |
| १३२ | १४५ | १२०. |
| ६६ | ७३ | ६० |

## २३ मागणीचे अंदाज

२३.१ ॲक्टिव्ह पॉवर तसेच रिॲक्टिव्ह पॉवरसाठी मागणीचे अल्प-मुदतीकरिता (एक दिवस ते ५२ आठवड्यांकरिता) अंदाज करण्याच्या जबाबदा-या राज्य भार प्रेषण केंद्र ठरवून देईल. ते, यासाठी संबंधित कंपन्यांमध्ये अंदाज काढण्यासाठी माहितीचे अदान-प्रदान करण्याकरिता अनुसरयाची कार्यपध्दती व वेळापत्रक ठरवून देईल.

परंतु असे की, या विनियमांच्या विनियम ८ नुसार पारेषण यंत्रणा आराखडा विकसित करताना राज्य पारेषण कंपनीने विचारात घेतलेल्या मागणीच्या अंदाजाचा संदर्भ, राज्य भार प्रेषण केंद्र करेल.

२३.२ संचलनाच्या प्रयोजनाकरिता लागू असलेल्या घटनाकालाकरिता मागणीचा अंदाज करण्यात येईल. इतर प्रचलित विनियमांखाली मागणीच्या अंदाजाबाबत माहिती पाठविण्याकरिता असलेल्या आवश्यक बाबींचा योग्य विचार करुनच घटनाकाल ठरविण्यात यावा.

## २४ हातांनी मागणी खंडित करणे

२४.१ जेव्हा फ्रिक्वन्सी ४९.५ Hz च्या खाली असेल तेव्हा उपयोगकर्ते त्यांचा विजेचा प्रत्यक्ष वापर, आप-आपल्या वापर वेळापत्रकानुसार मर्यादेत, ठेवण्याचा प्रयत्न करतील.

परंतु असे की, जेव्हा फ्रिक्वन्सी ४९.० Hz च्या खाली असेल तेव्हा राज्य भार प्रेषण केंद्र संबंधित उपयोगकर्त्यास त्याचा जादा वापर कमी व्हावा म्हणून हातांनी भार-नियमन करण्यास निदेश देईल.

परंतु असे की, या निदेशांमध्ये, देण्यात आलेले निदेश किती कालावधीकरिता किंवा यंत्रणा कोणत्या स्थितीत असेपर्यंत लागू असतील याचाही, समावेश असेल.

२४.२ काही आकस्मिक कारणांकरिता आणि/किंवा यंत्रणेच्या सुरक्षिततेला धोका असल्यास, राज्य भार प्रेषण केंद्र उपयोगकर्त्यांना वापर कमी करण्याचे निदेश देऊ शकेल आणि उपयोगकर्ते या निदेशांचे तत्काळ पालन करतील.

परंतु असे की, या निदेशांचे पालन न केल्यास अशी बाब या विनियमांच्या विनियम ३६ नुसार हाताळण्यात येईल.

२४.३ राज्य भार प्रेषण केंद्राने सूचित केल्याप्रमाणे जोडणी हातांनी खंडीत करणे शक्य व्हावे म्हणून उपयोगकर्ते व्यवस्था करतील.

## २५ अहवाल

२५.१ राज्य भार प्रेषण केंद्र आपल्या मागील आठवड्यातील कामगिरीची माहिती देण्यासाठी एक साप्ताहिक अहवाल तयार करेल व तो कळविण्यासाठी त्याच्या इंटरनेटवरील वेब-साइटवर ठेवेल. या साप्ताहिक अहवालात खालील बाबी असतील:-

(१) फ्रिक्वन्सीची रुपरेखा;

(२) निवडक उप-केंद्रांच्या व्होल्टेजची रुपरेखा;

(३) विजेच्या मागणी-पुरवठ्याबाबतची परिस्थिती;

(४) विद्युत निर्मितीतील व पारेषणातील महत्वाचे बंद;

(५) पारेषणातील मर्यादा; आणि

(६) राज्य ग्रिड संहितेच्या पुन्हापुन्हा घडणा-या/ महत्वाच्या अनुपालन न होणा-या घटना.

परंतु असे की, राज्य भार प्रेषण केंद्राच्या इंटरनेटवरील वेब-साइटवर हा साप्ताहिक अहवाल बारा (१२) आठवडे तरी उपलब्ध राहील.

परंतु आणखी असे की, अशा अहवालाची प्रत कोणत्याही उपयोगकर्ता किंवा पारेषण परवानाधारकाने मागणी केल्यास त्याला उपलब्ध करुन देण्यात येईल.

२५.२ राज्य भार प्रेषण केंद्र एक तिमाही अहवाल तयार करेल ज्यात यंत्रणेतील मर्यादा, सुरक्षा मानके आणि सेवेच्या दर्जाबाबतच्या आवश्यक बाबी भागवू न शकण्याची, कारणे असल्यास, त्याचबरोबर वेगवेगळ्या उपयोगकर्त्यांनी/ पारेषण परवनाधारकांनी केलेल्या विविध कार्यवाहींचा तपशील आणि अशा मर्यादा येण्याला जबाबदार असलेले उपयोगकर्ते व पारेषण परवनाधारक, यासंबंधी माहिती देण्यात येईल.

## २६ कार्यविषयक संपर्क

२६.१ राज्य ग्रिड वरील कामे व घटना

२६.१.१ राज्य भार प्रेषण केंद्र, ग्रिड वर कोणतीही कृती करण्यापूर्वी, ज्याच्या यंत्रणेवर या कृतीचा परिणाम होण्याची शक्यता आहे, अशा प्रत्येक उपयोगकर्ता आणि पारेषण परवानाधारकास कळवेल व करण्यात यावयाच्या कृतीचा तपशीलही देईल.

२६.१.२ राज्य भार प्रेषण केंद्र, ग्रिड वर कोणतीही घटना घडल्यास, ज्याच्या यंत्रणेवर अशी घटना घडल्यानंतर तिचा परिणम होण्याची शक्यता आहे, अशा प्रत्येक उपयोगकर्ता

आणि पारेषण परवानाधारकास ताबडतोब कळवेल व त्या घटनेत काय घडले त्याचा तपशील देईल परंतु ते कां घडले त्याचे कारण कळविण्याची गरज नसेल.

२६.२ उपयोगकर्ता किंवा पारेषण परवानाधारक यांच्या यंत्रणेवरील कृती व घटना

२६.२.१ उपयोगकर्ता किंवा पारेषण परवानाधारक यांच्या यंत्रणेवर कोणतीही कृती करण्यापूर्वी, जर राज्य ग्रिड वर या कृतीचा परिणाम होण्याची शक्यता असेल तर, संबंधित उपयोगकर्ता किंवा पारेषण परवानाधारक राज्य भार प्रेषण केंद्रास कळवेल, आणि करण्यात यावयाच्या कृतीचा तपशीलही देईल.

२६.२.२ उपयोगकर्ता किंवा पारेषण परवानाधारक यांच्या यंत्रणेवर कोणतीही घटना घडल्यास, अशी घटना घडल्यानंतर जर राज्य ग्रिड वर परिणाम होण्याची शक्यता असेल तर, राज्य भार प्रेषण केंद्रास ताबडतोब कळवेल, व त्या घटनेत काय घडले त्याचा तपशील देईल परंतु ते का घडले त्याचे कारण कळविण्याची गरज नसेल.

## २७ काम बंदचे नियोजन व समन्वय

२७.१ सर्व उपयोगकर्ते आणि पारेषण परवानेधारक पुढील आर्थिक वर्षांतील त्यांच्या प्रस्तावित काम बंदच्या कार्यक्रमाची माहिती, प्रत्येक वर्षी ३० नोव्हेंबर पर्यंत राज्य भार प्रेषण केंद्रास लेखी कळवतील. त्यात ज्याच्यासाठी बंदचे नियोजन करण्यात येत आहे त्या प्रत्येक विद्युत निर्मिति संच/पारेषण वाहिनी/आंतरजोडणी ट्रान्सफॉर्मरची माहिती, बंदची कारणे, प्रत्येक बंदसाठी निवडलेली तारीख व त्याचा कालावधी आणि जेथे त्यांत लवचिकता असेल तेथे अगदी अलिकडची सुरुवातीची तारीख व अगदी शेवटची समाप्तीची तारीख, याबाबत माहिती असेल.

२७.२ राज्य भार प्रेषण केंद्र पुढील आर्थिक वर्षांतील राज्य ग्रिडच्या बंदचा कार्यक्रमाचा आराखडा दर वर्षी ३१ डिसेंबरपर्यंत तयार करेल;

परंतु असे की, यंत्रणेची सुरक्षा व विश्वासार्हता विचारात घेऊन बंदचा कार्यक्रम तयार करण्यात येईल आणि अशा बंदमुळे यंत्रणेकडून भागविली न गेलेली मागणी कमीत कमी राहील अशा रितीने हा बंदचा कार्यक्रम विकसित करण्यात येईल;

परंतु आणखी असेही की, जल विद्युत निर्मिती केंद्राच्या बाबतीत, पाण्याचा पर्यायी वापर करण्यासंबंधी लागू असलेल्या मर्यादेच्या अधीन राहून, विद्युत निर्मितीसाठी पाण्याचा उपयोग जास्तीत जास्त करण्याच्या दृष्टीनेही अशी योजना प्रयत्नशील राहील.

२७.३ पारेषण बंद नियोजन हे विद्युत निर्मिती बंद नियोजनाशी सुसंगत असेल आणि वितरण यंत्रणा बंद नियोजन हे विद्युत निर्मिती व पारेषण बंद नियोजनाशी सुसंगत असेल.

२७.४ बंदचा अंतिम कार्यक्रम सर्व उपयोगकर्ते आणि पारेषण परवानेधारकांना दर वर्षी ३१ जानेवारीपर्यंत कळविण्यात येईल.

परंतु असे की, उपयोगकर्ते आणि पारेषण परवानेधारकांशी सल्लामसलत करुन बंदच्या कार्यक्रमास राज्य भार प्रेषण केंद्र अंतिम स्वरुप देईल.

परंतु आणखी असे की, वरील वार्षिक बंद कार्यक्रमाचा आढावा राज्य भार प्रेषण केंद्राकडून सर्व संबंधित व्यक्ती/संस्थांशी समन्वय साधून मासिक तत्त्वावर घेण्यात येईल आणि आवश्यकता वाटल्यास त्यात बदल करण्यात येतील.

२७.५ नियोजित वेळापत्रकानुसार बंद ठेवण्यापूर्वी किमान दोन (२) आठवडे, प्रत्येक उपयोगकर्ता किंवा पारेषण परवानाधारक राज्य भार प्रेषण केंद्रास कळवेल व त्यासाठी राज्य भार प्रेषण केंद्राची पूर्व-परवानगी घेईल.

२७.६ खालीलपैकी कोणतीही घटना घडल्यास राज्य भार प्रेषण केंद्रास नियोजित बंद लांबणीवर टाकण्याचा प्राधिकार असेल:-

(१) ग्रिड मधील मोठा बिघाड ( पूर्ण काळोख);

२) यंत्रणेची अलगता;

३) यंत्रणेतील इतर कोणतीही घटना जिचा, प्रस्तावित बंदमुळे, यंत्रणेच्या सुरक्षेवर विपरीत परिणाम होऊ शकेल.

परंतु असे की, राज्य भार प्रेषण केंद्र, शक्य होईल तितके लवकर, बंदचा सुधारित कार्यक्रम, बंदच्या योजनेत केलेल्या सुधारणांसाठीच्या उचित कारणांसह, कळवेल.

२७.७ यंत्रणेत आणीबाणी उद्‌भवल्यास, ज्यात विद्युत निर्मितीची हानि, पारेषण वाहिन्यात बिघाड, ग्रिड मधील अडथळे व यंत्रणेची अलगता यांचा समावेश असेल, नियोजित बंदला मान्यता देण्यापूर्वी राज्य भार प्रेषण केंद्र परिस्थितीचा योग्य आढावा घेईल.

## २८ परिस्थिती पूर्व-पदावर आणण्याची कार्यपध्दती

२८.१ अंशतः किंवा पूर्ण काळोखानंतर परिस्थिती पूर्व-पदावर आणण्याची सविस्तर योजना व कार्यपध्दतीला राज्य भार प्रेषण केंद्र, प्रादेशिक भार प्रेषण केंद्र, उपयोगकर्ते आणि पारेषण परवानेधारकांशी समन्वय साधून, अंतिम स्वरुप देईल.

२८.२ या कार्यपध्दतीचा आढावा पुढील प्रत्येक वर्षी एकदा घेण्यात येऊन ती कायम करण्यात येईल आणि/ किंवा त्यात सुधारणा करण्यात येतील. राज्य भार प्रेषण केंद्रातर्फे, दर सहा महिन्यातून निदान एकदा तरी, उपयोगकर्ते आणि पारेषण परवानेधारकांशी समन्वय साधून व सल्लामसलत करुन, वेगवेगळ्या उप-यंत्रणांच्या कार्यपध्दतीचे प्रतिकृतीवर प्रशिक्षण देण्यासाठी एक प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात येईल.

२८.३ विद्युत निर्मिती केंद्रांची यादी तसेच ब्लॅक स्टार्ट सुविधा, आंतर-राज्य/आंतर प्रादेशिक जोडण्या, तालबध्दतेची ठिकाणे (सिंक्रोनाइझिंग पॉइंट्स) आणि प्राधान्याने पूर्व-पदावर आणण्याचा महत्वाचा विद्युत पुरवठा, यांची माहिती राज्य भार प्रेषण केंद्रातर्फे तयार करण्यात येईल व त्याच्याकडे ती उपलब्ध असेल.

२८.४ काळोखानंतर परिस्थिती पूर्व-पदावर आणण्याच्या कार्यपध्दतीमध्ये राज्य भार प्रेषण केंद्राला, ग्रिड पूर्व-पदावर शक्य तितके जास्तीत जास्त लवकर आणण्यासाठी, आवश्यकतेनुसार व्होल्टेज आणि फ्रिक्वन्सीसाठीच्या घटित सुरक्षा मानकांनी काम चालू ठेवण्याचे प्राधिकार असतील.

२८.५ ग्रिड जोपर्यंत नेहमीच्या स्थितीत येत नाही तोपर्यंत, परिस्थिती पूर्व-पदावर आणण्यासाठी संपर्काची सर्व साधने फक्त संचलनविषयीच्या संपर्कासाठी वापरण्यात येतील.

## २९ घटनेची माहिती

२९.१ माहिती द्यावयाच्या घटना

२९.१.१ खालीलपैकी कोणत्याही घटनांची माहिती उपयोगकर्ता/ पारेषण परवानाधारकाला किंवा राज्य भार प्रेषण केंद्राला, द्यावी लागेल:-

(१) सुरक्षा मानकांचा उल्लंघन;

(२) ग्रिड मधील बेशिस्त;

(३) राज्य भार प्रेषण केंद्राच्या सूचनांचे अनुपालन न होणे;

(४) यंत्रणेचे आयलँडिंग/ यंत्रणा दुभंगणे **;**

(५) यंत्रणा कोलमंडून पूर्ण/ अंशतः काळोख पडणे;

(६) राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेतील कोणत्याही भागाला संरक्षण देण्यात आलेले अपयश;

(७) विद्युत यंत्रणेतील अस्थिरता; आणि

(८) राज्य ग्रिड मधील कोणताही भाग बंद पडणे.

२९.२ माहिती कळवावयाची कार्यपध्दत

२९.२.१ उपयोगकर्ता किंवा पारेषण परवानाधारक, घटनेविषयी सुरुवातीला राज्य भार प्रेषण केंद्राला तोंडी सूचना देईल व त्यानंतर, विनियम २९.२.३ नुसार राज्य भार प्रेषण केंद्राला, घटना घडल्यापासून दोन (२) आठवड्यांच्या आत, लेखी अहवाल पाठवेल.

२९.२.२ राज्य भार प्रेषण केंद्र, घटनेविषयी सुरुवातीला उपयोगकर्ता/पारेषण परवानाधारकाला तोंडी सूचना देईल व त्यानंतर, विनियम २९.२.३ नुसार संबंधित उपयोगकर्ता/पारेषण परवानाधारकाला लेखी अहवाल, घटना घडल्यापासून दोन (२) आठवड्यांच्या आत, पाठवेल.

२९.२.३ राज्य भार प्रेषण केंद्राला किंवा उपयोगकर्ता/पारेषण परवानाधारकाला, जसे असेल तसे, पाठविलेल्या लेखी अहवालांत तोंडी सूचनेने दिलेल्या माहितीस पुष्टी देण्यात येईल तसेच घटनेबाबत खालील तपशील देण्यात येईल:-

(१) घटनेची वेळ व तारीख;

(२) ठिकाण;

(३) (घटनेशी) थेट संबंध आलेली संयंत्रे आणि/ किंवा उपकरणे;

(४) घटनेचे वर्णन व कारण;

(५) (घटने)पूर्वीची स्थिती;

(६) विजेच्या मागणीत आणि/ किंवा निर्मितीत (MW मध्ये) आलेला व्यत्त्यय आणि व्यत्त्ययाचा कालावधी;

(७) डिस्टर्बन्स रेकॉर्डर, घटना खाते-नोंदी ठेवणारे उपकरण, माहिती प्राप्त करुन घेण्याच्या यंत्रणेसह सर्व नोंदी करणा-या उपकरणांच्या अभिलेख्यांच्या प्रतीसह यंत्रणेची सर्व संबंधीत माहिती;

(८) बंद पडण्याचा घटनाक्रम वेळेसह;

(९) रिले फ्लॅग्सचा तपशील; आणि

(१०) सुधारात्मक उपाययोजना.

२९.२.४ राज्य भार प्रेषण केंद्र, पारेषण परवानाधारक किंवा उपयोगकर्ता, जसे असेल तसे, १००० मेगावॅटहून अधिक विद्युत निर्मिती क्षमतेवर किंवा भारावर विपरित परिणाम करणा-या घटना आयोगास ताबडतोब लेखी कळवतील.

परंतु असे की, अशी घटना घडल्यापासुन २४ तासांच्या आत आयोगाला संक्षिप्त अहवाल पाठविण्यात येईल. य अहवालामध्ये घटनेचा थोडक्यात तपशील, व्याप्ती व घटनेचे संभाव्य कारण असेल,

## ३० राज्य भार प्रेषण केंद्र आणि उप-भार प्रेषण केंद्र

३०.१ या विनियमांतर्गत आपली कार्ये पार पाडत असताना, राज्य भार प्रेषण केंद्राने विकसित केलेल्या कार्यपध्दती व कृतींमध्ये खालील बाबी, जेथे लागू असेल तेथे, उपलब्ध असतील:-

(१) उप-भार प्रेषण केंद्राचे कार्य व जबाबदा-या;

(२) राज्य भार प्रेषण केंद्र आणि उप-भार प्रेषण केंद्रे, यांच्यामध्ये संपर्क सुविधा;

(३) राज्य भार प्रेषण केंद्र आणि उप-भार प्रेषण केंद्रे, यांच्यामध्ये माहितीचे अदान-प्रदान; आणि

(४) राज्य भार प्रेषण केंद्र किंवा आयोगास उचित वाटलेली अन्य कोणतीही बाब.

## ३१. राज्य भार प्रेषण केंद्र, पारेषण परवानेधारक आणि उपयोगकर्ते

३१.१ या विनियमांनुसार आपली कार्ये पार पाडत असताना, राज्य भार प्रेषण केंद्राने विकसित केलेल्या कार्यपध्दती व कृतींमध्ये खालील बाबी, जेथे लागू असेल तेथे, उपलब्ध असतील:-

(१) राज्य भार प्रेषण केंद्र, उपयोगकर्ते आणि पारेषण परवानेधारक यांचे कार्य व जबाबदा-या;

(२) राज्य भार प्रेषण केंद्र, उपयोगकर्ते आणि पारेषण परवानेधारक यांच्यात माहितीचे अदान-प्रदान; आणि

(३) राज्य भार प्रेषण केंद्र किंवा आयोगास उचित वाटलेली अन्य कोणतीही बाब.

## भाग-इ: अनुसूची व प्रेषण संहिता

३२ या विनियमांच्या अधिसूचनेनंतर सहा (६) महिन्यांत आयोग एक अनुसूची व प्रेषण संहिता विहीत करेल.

परंतु असे की, अनुसूची व प्रेषण संहिता विकसित करताना आयोग राज्य भार प्रेषण केंद्राशी सल्लामसलत करेल.

परंतु असे की, अनुसूची व प्रेषण संहितेला अंतिम स्वरुप देण्यापूर्वी, जनतेकडून व हितसंबंधित व्यक्ती/संस्थांकडून अभिप्राय मागविण्यासाठी आयोग त्याच्या वेब-साइटवर अनुसूची व प्रेषण संहितेचा प्रारुप मसुदा ठेवेल.

परंतु आणखी असे की, जनतेला आणि हितसंबंधित व्यक्ती/ संस्थांना त्यांचे अभिप्राय सादर करण्यासाठी आयोग कमीत कमी एक (१) महिन्याचा कालावधी देईल.

३३ अनुसूची व प्रेषण संहितेमध्ये खालील बाबींसाठी तरतूदी असतील:-

(१) दैनिक तत्त्वावर विद्युत निर्मिती/ पुरवठा अनुसूची तयार करण्यासाठी व निर्गमित करण्यासाठी राज्य भार प्रेषण केंद्र आणि उपयोगकर्ते यांनी करावयाची कार्यवाही व जबाबदा-या;

(२) अनुसूची व प्रेषण संहितेच्या प्रयोजनाकरिता राज्य भार प्रेषण केंद्र आणि उपयोगकर्ते यांच्यात माहितीचे अदान-प्रदान चालू ठेवण्यासाठीची पध्दत;

(३) अनुसूची व प्रेषण संहितेच्या प्रयोजनाकरिता राज्य भार प्रेषण केंद्र आणि पारेषण परवानाधारक यांच्यात माहितीचे अदान-प्रदान चालू ठेवण्यासाठीची पध्दत;

(४) अनुसूची व प्रेषण संहितेच्या प्रयोजनाकरिता राज्य भार प्रेषण केंद्र आणि प्रादेशिक भार प्रेषण केंद्र यांच्यात माहितीचे अदान-प्रदान चालू ठेवण्यासाठीची पध्दत;

परंतु असे की, अधिनियमाच्या कलम ७९ खाली केंद्रीय विद्युत नियामक आयोगाने विहीत केलेल्या ग्रिड संहितेमध्ये समाविष्ट असलेल्या अनुसूची व प्रेषण संहितेशी अशा तरतूदी सुसंगत असतील.

(५) उपयोगकर्त्यांना प्रत्यक्ष वेळेवर निर्गमित करावायाच्या प्रेषण/वापराच्या सूचना आणि, गरज लागल्यास, अनुसूचीची फेर-आखणी, व त्यांचे पालन;

(६) निर्धारित व प्रत्यक्ष निर्मिती तसेच निर्धारित व प्रत्यक्ष वापर यांच्यातील फरकाचा मेळ घालण्याची उचित व्यवस्था आणि रिॲक्टिव्ह पॉवरच्या दर निश्चितिकरणासाठी सूत्र;

परंतु असे की, असा मेळ पारदर्शक पध्दतीने घालण्यात येईल व त्यात आंकडेवारीच्या पडताळणीकरिता पुरेशी कार्यपध्दत समाविष्ट असेल.

(७) व्होल्टेज आणि फ्रिक्वन्सीच्या व्यवस्थापनेसाठी राज्य भार प्रेषण केंद्र आणि उपयोगकर्ते यांच्या जबाबदा-या; आणि

(८) अनुसूची व प्रेषण संहितेमध्ये समावेशासाठी आयोगास उचित वाटलेला अन्य कोणताही मुद्दा.

## भाग-फ: मीटर संहिता

### ३४ मीटरबाबतच्या आवश्यक बाबी

३४.१ या विनियमांच्या अधिसूचनेपासून साठ (६०) दिवसांच्या आत राज्य पारेषण कंपनी मीटर संहिता विकसित करेल व ती आयोगाकडे मान्यतेसाठी सादर करेल.

परंतु असे की, वर नमूद केल्याप्रमाणे मीटर संहिता विकसित करण्यात येऊन तिला आयोगाची मान्यता मिळेपर्यंत, प्रचलित संबंधित संविधीतील तरतूदी लागू राहतील.

३४.२ वाणिज्यिक आणि संचलनाच्या प्रयोजनाकरिता, उपयोगकर्ता किंवा पारेषण परवानाधारक यांनी जोडणीच्या ठिकाणी पुरवावयाची मीटर्स, मीटर्स बसविण्यासाठी व चालविण्यासाठी, किमान आवश्यक बाबी आणि मानकांची तरतूद मीटर संहितेमध्ये, करण्यात आलेली असेल.

परंतु असे की, अशा आवश्यक बाबी, अधिनियमाच्या कलम ५५ खाली प्राधिकरणाकडून विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा विनियमाशी सुसंगत असतील.

परंतु आणखी असे की, जर अशा मीटर्समध्ये असलेली माहिती वाणिज्यिक आणि संचलनाच्या प्रयोजनाकरिता हवी असेल तर अशा आवश्यक बाबी उपयोगकर्ता किंवा पारेषण परवानाधारकाच्या विद्युत यंत्रणेच्या अंतर्गत असलेल्या इतर कोणत्याही ठिकाणी देखील लागू राहतील.

३४.३ राज्य पारेषण कंपनीने मान्यतेसाठी सादर केलेल्या मीटर संहितेचा आयोग आढावा घेईल आणि-

(अ) आयोगास उचित वाटतील अशा अटी व बदलांसह मीटर संहितेला मान्यता देईल; किंवा

(ब) अधिनियम, हे विनियम अथवा अधिनियमाच्या कलम ७९ च्या उप-कलम (१) च्या खंड (एच) खाली विनिर्दिष्ट केलेल्या ग्रिड संहितेनुसार जर मीटर संहिता नसेल तर आयोग, त्यासंबंधीची कारणे लेखी नमूद करुन, ती संहिता नाकारेल आणि राज्य पारेषण कंपनीला मीटर संहितेचे सुधारित प्रारुप सादर करण्याचे निदेश देईल.

३४.४ राज्य पारेषण कंपनी मीटरच्या मानकांच्या संहितेची एक प्रत तिच्या इंटरनेट वरील वेब-साइटवर ठेवेल व लागू असलेल्या मीटरच्या मानकांच्या संहितेची एक प्रत तिची मागणी करणा-या कोणत्याही व्यक्तीस, प्रत काढण्यासाठी येणा-या खर्चाहून अधिक नसेल इतक्या वाजवी किंमतीला उपलब्ध करुन देईल.

३४.५ मीटरच्या मालकीसाठी व देखभालीसाठी जबाबदार असलेल्या संबंधित अभिकरणाचा (एजन्सीचा), म्हणजे उपयोगकर्ता किंवा पारेषण परवानाधारक यांचा, स्पष्ट उल्लेख मीटर संहितेमध्ये करण्यात येईल.

३४.६ मीटर संहितेमध्ये खालील बाबींचा उल्लेख करण्यात येईल-

(१) मीटरची जागा आणि मीटर बसविण्यासंबंधी तरतूदी;

(२) मीटरबाबत खुलासेवार सूचना व अचूकतेच्या मर्यादा;

(३) मीटरमधील माहितीची नोंद ठेवणे, संग्रह करणे, हस्तांतरण, संस्करण आणि साठवणूक, यासंबंधीचे अधिकार, जबाबदा-या व कार्यपध्दती;

(४) मीटरमधील माहितीच्या मालकीसंबंधीची तरतूद;

(५) वरील अचूकतेच्या मर्यादाना अनुरुप असल्याची खात्री करण्यासाठी प्रत्येक संबंधित अभिकरणाने अनुसरावयाच्या कॅलिब्रेशनच्या कार्यपध्दती;

(६) मीटर योग्य स्थितीत चालू राहण्यासाठीची देखभाल, मीटरची सुरक्षा, नवीन किंवा बदली मीटरची चांचणी, मीटर सील करणे व मीटरची तपासणी, यासंबंधीच्या कार्यपध्दती;

(७) मीटरच्या खोलीत प्रवेश करण्याच्या अधिकाराबाबतची तरतूद;

(८) मीटरमधील विसंगती, सदोष उपकरणे आणि मीटरमधील बिघाड दूर करण्यासाठीच्या कार्यपध्दती;

(९) मीटरबाबतचे वाद मिटविण्यासाठीच्या कार्यपध्दती; आणि

(१०) राज्य पारेषण कंपनी किंवा आयोगाला, मीटर संहितेमध्ये समावेश करण्यास उचित वाटेल अशी अन्य कोणतीही बाब .

**भाग-गः संकीर्ण**

## ३५ वाद

३५.१ राज्य ग्रिड संहितेमधील कोणत्याही तरतूदीच्या किंवा राज्य ग्रिड संहितेच्या तरतूदीखाली अधिसूचित करण्यात आलेले नियम आणि कार्यपध्दतीसंबधी अर्थनिश्चितीवरुन, कोणताही वाद निर्माण झाल्यास, तो वाद आयोगाकडे निर्णयासाठी पाठविण्यात येईल.

परंतु असे की, आयोगाने विनिर्दिष्ट केलेल्या मंचाकडे वाद पाठविण्यात येईल.

## ३६ अनुपालन

३६.१ या विनियमांमधील भाग-ब, भाग-क आणि भाग-फ मधील तरतूदी व अशा तरतूदींखाली विकसित करण्यात आलेले नियम व कार्यपध्दती यांच्या, उपयोगकर्ता आणि पारेषण यंत्रणा परवानाधारकाकडून होणा-या अनुपालनावर संनियंत्रण ठेवण्याची जबाबदारी राज्य पारेषण कंपनीची राहील;

परंतु असे की, राज्य पारेषण कंपनी कोणत्याही उपयोगकर्ता किंवा पारेषण परवानाधारक यांच्याविरुध्द अयोग्यरित्या भेदभाव करणार नाही किंवा अयोग्यरित्या खास मर्जी दाखविणार नाही.

३६.२ या विनियमांमधील भाग-ड आणि भाग-इ मधील तरतूदी व अशा तरतूदींखाली विकसित करण्यात आलेले नियम व कार्यपध्दती यांच्या, उपयोगकर्ता आणि पारेषण यंत्रणा परवानाधारकाकडून होणा-या अनुपालनावर संनियंत्रण ठेवण्याची जबाबदारी राज्य भार प्रेषण केंद्राची राहील;

परंतु असे की, राज्य भार प्रेषण केंद्र कोणत्याही उपयोगकर्ता किंवा पारेषण परवानाधारक यांच्याविरुध्द अयोग्यरित्या भेदभाव करणार नाही किंवा अयोग्यरित्या खास मर्जी दाखविणार नाही.

३६.३ राज्य ग्रिड संहितेच्या तरतूदी आणि/किं वा अशा तरतूदींखाली विकसित करण्यात आलेल्या नियम आणि कार्यपध्दतींचे जर सतत अनुपालन होत नसेल तर अशा बाबी आयोगास कळविण्यात येतील.

३६.४ पश्चिम विभागीय भार प्रेषण केंद्राकडून राज्यातील कोणत्याही पारेषण परवानाधारकाला किंवा इतर कोणत्याही परवानाधारकाला किंवा विद्युत निर्मिती कंपनीला (आंतर-राज्य पारेषण यंत्रणेशी जोडणी नसलेल्या) किंवा राज्यातील उप-केंद्राला द्यावयाचे सर्व निदेश हे राज्य भार पारेषण केंद्रामार्फत देण्यात येतील आणि राज्य भार पारेषण केंद्र परवानेधारक किंवा विद्युत निर्मिती कंपनी किंवा उप-केंद्र यांच्या कडून त्याची यथोचितरित्या पूर्तता होईल, याची खात्री करुन घेईल.

३६.५ ग्रिडचे एकात्मिकरित्या संचलन व्हावे व विद्युत यंत्रणेचे संचलन जास्तीत जास्त कमी खर्चात व कार्यक्षमतेने होण्याची खात्री करुन घेण्यासाठी राज्य भार प्रेषण केंद्र आवश्यक ते निदेश देईल व देखरेख व नियंत्रण ठेवेल.

३६.६ विद्युत यंत्रणेच्या संचलनाशी जोडला गेलेला प्रत्येक पारेषण परवानाधारक व उपयोगकर्ता या विनियमांच्या विनियम ३६.५ खाली राज्य भार प्रेषण केंद्राने दिलेल्या निदेशांचे पालन करेल.

३६.७ जर विजेचा दर्जा किंवा राज्य ग्रिडच्या सुरक्षित व एकात्मिक संचलनाबाबत किंवा या विनियमांच्या विनियम ३६.५ खाली राज्य भार प्रेषण केंद्राने दिलेल्या निदेशांबाबत एखादा वाद उद्‌भवला तर तो वाद निर्णयासाठी आयोगाकडे पाठविण्यात येईल.

परंतु असे की, आयोगाचा निर्णय प्रलंबित असेपर्यंत, राज्य भार प्रेषण केंद्राने दिलेल्या निदेशांचे पारेषण परवानाधारक किंवा उपयोगकर्ता पालन करतील.

३६.८ उपयोगकर्ता किंवा पारेषण परवानाधारक यांच्याकडूण जर राज्य ग्रिड संहितेच्या तरतूदी आणि/किं वा अशा तरतूदींखाली विकसित करण्यात आलेल्या नियम आणि

कार्यपध्दतींचे सतत पालन करण्यात कसूर झाल्यास, अशा उपयोगकर्ता किंवा पारेषण परवानाधारकाची संयंत्र आणि/किंवा उपकरणाची जोडणी तोडण्यात येईल.

३६.९ राज्य ग्रिड संहितेच्या तरतूदी आणि/किंवा अशा तरतूदींखाली विकसित करण्यात आलेल्या नियम आणि कार्यपध्दतींचे उपयोगकर्ता किंवा पारेषण यंत्रणा परवानाधारक यांच्याकडून पालन करुन घेण्याबाबत व त्याचे संनियंत्रण करण्याबाबत, आयोगास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांवर, विनियम ३६ मध्ये काहीही असले तरी त्याचा परिणाम होणार नाही.

## ३७ दुरुस्ती करण्याचे अधिकार

३७.१ आयोग, कोणत्याही वेळी, या विनियमांतील कोणत्याही तरतूदीमध्ये बदल, फेरबदल किंवा सुधारणा करेल.

## ३८ अडचणी दूर करण्याचे अधिकार

३८.१ या विनियमांतील तरतूदींची अंमलबजावणी करताना जर काही अडचणी आल्या तर आयोग, साधारण किंवा विशेष आदेशाने, अडचणी दूर करण्यासाठी आवश्यक असेल अशा, अधिनियमातील तरतुदींशी विसंगत नसणाऱ्या, तरतूदी करु शकेल.

मुंबई, (मालिनी शंकर)
१५ फेब्रुवारी, २००६ सचिव, मविनिआ